जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ज्याचं त्याचं नंदनवन...माझं नंदनवन...

प्रत्येक भावनाशील व सहृदयी माणसाचं एक स्वप्न असत... स्वप्नातलं जग असतं...नंदवन असतं...माझं नंदनवन कसं आहे सांगू? मला हवं आहे चित्ताचं शांतपणा नि जगण्यातलं स्पर्धाशून्य निरागसपण अस लहानसं भावविश्व की ज्यात माझ्या अस्तित्वाची चाहुल जीवलगांनाच जाणवेल. निसर्गाच्या सर्वांगसुंदर सान्निध्यात मला स्वत:शीच हितगुज करता येईल, स्वत:ला शोधता येईल. 'मैं अकेला अपनी धुन में मगन...जिंदगी का मजा लिए जा रहा हूँ' देव आनंदच्या या गीताप्रमाणे जगणं म्हणजे माझं नंदनवन.

मनाशी खुणगाठ मारायची की नंदनवन वेगळ नी महत्वाकांक्षा वेगळी. महत्वकांक्षेच्या पोटी उशिर किंवा पराभव दडलेला असू शकतो. नंदनवन ही अगदीच वेगळी, तेजाळणारी अशी अनोखी सृष्टी असते. आज ना उद्या महत्वकांक्षा सफल होऊ शकते. नंदनवन मात्र कायम दूरवर पालवत असतं. लाखो, हजरांत अगदी बोटांवर मोजता येणाऱ्या इतक्या नशिबवानांच्याच ललाटी स्वत:च्या स्वप्नातील नंदनवनाची प्राप्ती कोरलेली असते. सामान्यांचे नंदनवन काहीच्या काही दूर...पौर्णिमेच्या चंद्रबिंबासारखं...अधांतरी तरंगत असतं...तुमच्या नंदनवनाच काय?...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१



# महिला वकिलाच्या घरात घुसून ऐवज लुटणारा संशयित पोलिसांच्या ताब्यातून झाला पसार

नगर -मोक्का गुन्हा दाखल असलेल्या संशयित आरोपीने या गुन्ह्याचे वकिलपत्र असलेल्या महिला वकिलाच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली. घरातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोक्का कोर्ट केस कामकाजाचे मुळ कागदपत्र असा १लाख ९२ हजार ७०० रूपयांचा ऐवज बळजबरीने नेला.गुरूवारी (दि.८) दुपारी साडेचारच्या सुमारास काटवन खंडोबा परिसरातील सप्तपदी मंगल कार्यालयाच्या पाठीमागे ही घटना घडली.

या प्रकरणी ॲड. नाजमीन वजीर बागवान (वय ३२) यांनी रात्री उशिरा दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण बबन कोळपे (रा. विळद ता. नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. त्याला कोतवाली पोलिसांनी शुक्रवारी (दि.९) पकडले मात्र वैद्यकीय तपासणीसाठी त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले असता तेथून तो पसार झाला आहे.

किरण कोळपे विरोधात २०२२ मध्ये एमआयडीसी पोलीस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्ह्याचे वकिलपत्र फिर्यादी यांच्याकडे होते. त्यावेळी फिर्यादी व किरण यांची ओळख झाली होती. दरम्यान किरण विरोधात २०२३ मध्ये राहुरी पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात त्याला मोक्का लावण्यात आला होता. या गुन्ह्याचे कामकाजही फिर्यादी पाहत होत्या. त्याला या गुन्ह्यात अटक झाली होती व नंतर जामीन मिळाला होता.

दरम्यान, गुरूवारी दुपारी साडेचारच्या सुमारास फिर्यादी त्यांच्या काटवन खंडोबा येथील घरी असताना किरण तेथे आला. त्याने फिर्यादीच्या घरात अनाधिकाराने प्रवेश करून फिर्यादीचा बळजबरीने हात पिरगाळून दुखापत केली. घरातील कपाटाची उचकापाचक करून त्याने साडेतीन तोळ्याचे सोन्याचे गंठण, कानातील सोन्याच्या साखळ्या, ३२ हजार ७०० रूपयांची रोकड व किरण याच्याविरूध्द दाखल मोक्का कोर्ट केस कामकाजाचे मुळ कागदपत्रे नेले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान आरोपीने शुक्रवारी (दि.९) सायंकाळी फिर्यादी वकील महिलेचा पाठलाग केला. त्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिल्यावर कोतवाली पोलिसांनी चांदणी चौक परिसरात त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला वैद्यकीय तपासणी साठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र पोलिसांनी योग्य खबरदारी न घेतल्याने सदर आरोपी पोलिसांच्या ताब्यातून पसार झाला आहे.



नगर शहरातील नागरिकांकडून सर्रास वाहतुकीची पायमल्ली होत आहे अल्पवयीन मुले रस्त्यावर वाहन चालवत आहेत. युवक ट्रिपल सीट वाहनांवर प्रवास करत आहे तसेच पॅगो रिक्षा चालक आपल्या रिक्षामध्ये १५ ते १६ प्रवासी घेऊन जाताना दिसत आहे. (छाया - धनेश कटारिया)

# शहरात वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली

## शहर वाहतूक पोलिसांच्या उदासीनतेवर मोठा प्रश्नचिन्ह

नगर- शहरातील अनेक ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून वाहतूक नियमांची पायमल्ली करताना नागरिक अनेक वेळा पाहायला मिळतात तसेच अल्पवयीन मुले सर्रास रस्त्यावर वाहने चालवताना दिसतात तसेच शाळेतील विद्यार्थी कॉलेजमधील विद्यार्थी व तरुण मुले दुचाकीवर ट्रिपल सीट विदाऊट नंबर प्लेट दिसतात तसेच पॅगो चालक नियमबाह्य पॅसेंजर बसवतात अक्षरशा एका पॅगोमध्ये १५ ते १६ पॅसेंजर बसलेले दिसतात या गंभीर बाबींकडे जिल्हा पोलीस अधीक्षक सह शहर वाहतूक शाखा जाणीवपूर्वक डोळे झाक करत आहे.

राज्यात सरकारने वाहतूक नियंत्रणाबद्दल अनेक वेळा जनजागृती केली व कायद्यांमध्ये बदलही केला पण याची अंमलबजावणी मात्र पोलीस प्रशासनच नगर शहरात करताना दिसत नाही. शहरांमध्ये डीएसपी चौक सोडला तर कोणत्याच भागामध्ये चौकामध्ये ट्रॅफिक पोलीस कर्मचारी पाहायला दुर्मिळ झाले आहेत त्यामुळे वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या नागरिकांना वाव मिळते आणि रोज दिवसभर वाहतुकीचे नियम सर्रास पायदळी तुडवले जातात शहरातील प्रत्येक चौकामध्ये, भागामध्ये रहदारी मोठ्या प्रमाणावर असते त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर कोणी कारवाई करत नसल्याने याचा त्रास नियम पाळणाऱ्या नागरिकांना होतो अनेक अपघातांनाही त्यांना सामोरे जावे लागते विशेष तर रॉंग साईडने वाहन चालवणे आणि सिग्नल बंद असल्यामुळे कोणत्याच ठिकाणी वाहन न थांबवता सर्रास मध्ये घुसून आपले वाहन नियमबाह्य पद्धतीने चालवणे अशा नागरिकांचे प्रमाण शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

शहरातील ज्या ज्या भागांमध्ये रस्त्यालगत हॉटेल, हॉस्पिटल आहेत त्या त्या भागांमध्ये पार्किंगची सोय नसल्याने वाहने रस्त्यावर लागत असल्याने आणि त्यात हातगाडी वाल्यांचे अतिक्रमण मुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते.

या सर्व गंभीर बाबींबाबत नागरिकांनी अनेक वेळा निवेदन व आंदोलन केले आहेत मात्र हा गंभीरतेचा प्रश्न नगर शहरात अजून काय सुटलेला दिसत नाही. उलट यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे, त्यामुळे जिल्हा अधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी जातीने लक्ष घालून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा नगरकर व्यक्त करत आहेत.

# अभियानात सहभागी होऊन १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान अहमदनगर शहरातील प्रत्येक घरावर 'तिरंगा' फडकवावा

## मनपा आयुक्तांचे नगरकरांना आवाहन; जनजागृतीसाठी शहरातून रॅलीचे आयोजन

नगर - केंद्र शासनाच्या निर्देशानुसार यावर्षीही स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधित हर घर तिरंगा अभियान राबवण्यात येत आहे. आपल्या शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकावून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा असे आवाहन अहमदनगर महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

हर घर तिरंगा अभियानाच्या जनजागृतीसाठी नागरिकांना अभियानात सहभागी करून घेण्यासाठी महानगरपालिका विविधि उपक्रम राबवत आहे. याचाच भाग म्हणून गुरुवारी सकाळी महानगर पालिका व रेसिडेन्शियल हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने शहरातून रॅली काढण्यात आली.

रेसिडेन्शियल हायस्कूल येथून रॅलीला सुरुवात झाली. तेथून निलक्रांती चौक, सिद्धीबाग, तोफखाना, बागडपट्टी, नेता सुभाष चौक, चितलेरोड, चौपाटी कारंजा, दिल्लीगेटमार्गे पुन्हा रेसिडेन्शियल हायस्कूल येथे रॅलीची सांगता झाली.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिक व शूरविरांनी बलिदान दिले त्यांचे स्मरण करून हर घर तिरंगा अभियान राबवावे. शहरात प्रत्येक घरावर तिरंगा ध्वज फडकावला जावा यासाठी सर्व नागरिकांनी अभियानात सहभागी व्हावे. महानगर पालिकेच्यावतीने जनजागृतीसाठी प्रभातफेरी, सायकल रॅली, मॅरेथॉन, सह्यांची मोहीम आदी उपक्रम राबवले जात आहे.

स्वातंत्र्याचा उत्सव संपुर्ण शहरात उत्साहात साजरा व्हावा यासाठी महानगर पालिकेमार्फत काही प्रमाणात तिरंगा ध्वज वितरीत करण्यात येणार आहेत. नागरिकांनी संपूर्ण शहरात हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार नगरच्या प्रमिला झावरे यांना जाहीर



नगर - जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका प्रमिला बाबासाहेब झावरे यांना स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त दिला जाणारा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनानिमित्त सहावे राज्यस्तरीय काव्य संमेलन रंगणार असून, यामध्ये पाहुण्यांच्या हस्ते झावरे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

झावरे २२ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात योगदान देऊन विद्यार्थी घडवित आहे. त्या टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) या गावातील असून, सध्या धोत्रे बुद्रुक (ता. पारनेर) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# विजेचा शॉक बसून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

नगर - शेतात विहिरीवर असलेला वीजपंप चालू करण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय तरुणाचा विजेचा शॉक बसून जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील भोरवाडी गावच्या शिवारात शुक्रवारी (दि.९) दुपारी घडली. सागर अनिल ठाणगे असे या मयत युवकाचे नाव आहे.



सागर हा शुक्रवारी शेतात काम करत होता, तो विहिरीवर वीज पंप चालू करण्यासाठी गेला. त्यावेळी त्याला विजेचा शॉक बसला. त्यामुळे तो बेशुद्ध पडला. ही बाब लक्षात आल्यावर त्याचे नातेवाईक सुनिल ठाणगे यांनी त्यास दुपारी १.१० च्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.देवेंद्र गोयल यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत सागर याच्या पश्चात आई वडील व १ बहिण असा परिवार आहे.

## मुक्त आणि दूरस्थ प्रशाळेंतर्गत प्रवेश घेण्याचे आवाहन

नगर- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. हे अभ्यासक्रम मुक्त आणि दूरस्थ प्रशाळेंतर्गत विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र) संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केडगाव देवी रोड, नगर या अभ्यास केंद्रावर सुरू आहेत. नोकरी व व्यवसाय करणारे, तसेच गृहिणी, अपूर्ण शिक्षण राहिलेले विद्यार्थी, गृहस्थ यांच्यासाठी प्रवेशाची यांना या ठिकाणी प्रवेश घेऊन आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इच्छुक व्यक्तींनी प्रवेशासाठी महाविद्यालयाशी संपर्क साधावा. आपले अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करावे व सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्र संचालक व प्राचार्य डॉ. रविंद्र मारुती चोभे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८५०९९८७९७, ७५८८० ९२५१९, ७९७२९९०५११, ८७६७८ ८८७४३ या मोबाईलवर संपर्क साधावा.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त केलेल्यांवरील कारवाईबाबतचे 'आंदोलन' तात्पुरते स्थगित

नगर - बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त केलेल्यांवर कारवाई करण्यासाठी समिती गठित करून कारवाईसाठी आंदोलकांकडून वेळ मागून घेतल्यामुळे जिल्हा रुग्णालय, अहमदनगर समोरील आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी दिली आहे.



बनावट दिव्यांग प्रकरणी कारवाई होण्यासाठी क्रांतीदिनी जिल्हा रुग्णालय, अहमदनगर समोर आंदोलन करताना भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, पोपटराव साठे, वीर बहादुर प्रजापती, बबलू खोसला, कैलास पठारे, बाळासाहेब पालवे, जसवंतसिंग परदेशी, अशोक भोसले व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे.

बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे अनेकांनी केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, राज्य शासनाच्या विविध विभागात नोकऱ्या आणि सवलती मिळवून मूळ दिव्यांग व्यक्तींवर खूप मोठा अन्याय केलेला आहे. यामुळे शासनाची आणि समाजाची फसवणूक झालेली आहे. सरकारी रुग्णालयातील वैद्यकीय बोर्ड व्यक्तीची तपासणी करून तो दिव्यांग आहे की नाही हे ठरवते मात्र अनेक धडधाकट व्यक्ति दिव्यांग नसताना देखील त्यांना ४०% दिव्यांग दाखवून या बोर्डाने प्रमाणपत्र दिलेली आहेत. यामध्ये डोळ्यात व कानात दिव्यांग असलेले लोक मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे ज्या दिव्यांग व्यक्तींना रुग्णालयातील तपासणीनंतर प्रमाणपत्र मिळालेली आहेत त्यांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत पडताळणी होणे आवश्यक आहे. दिव्यांग नसताना अथवा कागदपत्रे अपुरे असताना ज्या व्यक्तींना दिव्यांग दाखविले गेले आहे त्यांचे प्रमाणपत्र रद्द होऊन अशा व्यक्ती व प्रमाणपत्र देणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हे दाखल करावेत तसेच दिव्यांग नसताना दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन ज्या व्यक्तीने नोकरी, बदली व इतर शासकीय सवलती मिळविल्या त्या तत्काळ रद्द करून गुन्हे दाखल व्हावे, तसेच त्यांना शासनाकडून मिळालेला पगार व इतर लाभ वसूल व्हावेत अशी मागणी ५.८.२०२४ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. या निवेदनामध्ये शासनाच्या स्वावलंबन कार्ड या संकेतस्थळावर युडीआयडी क्रमांक मिळवत बनावट दिव्यांग प्रमाणपत्र मिळविलेल्या दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल न झाल्यास क्रांतीदिनी नऊ ऑगस्ट रोजी जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर समोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

याबाबत जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आंदोलन स्थळी चर्चा करून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी कार्यालयामार्फत समिती गठित करण्यात आली असल्याचे कळवुन समितीचा अहवाल प्राप्त होण्यासाठी आंदोलकांकडून वेळ मागून घेतला. त्यानुसार समितीला याप्रकरणी कारवाई करण्यासाठी वेळ दिलेला असून राज्य व केंद्र स्तरावरील बनावट दिव्यांगांवर शासनाकडून कारवाई होणार असल्याने तात्पुरते स्वरूपात आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, पोपटराव साठे, अशोक भोसले, वीर बहादुर प्रजापती, बबलू खोबला, कैलास पठारे, बाळासाहेब पालवे, राम धोत्रे, जसवंत सिंग, परदेशी, काटकर, अर्शदभाई शेख, जयेश देवळालीकर व सुधीर भद्रे यांनी दिली आहे.

## सरस्वतीबाई खडके यांचे निधन

नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवाशी सरस्वतीबाई विश्वनाथ खडके (वय ८०) यांचे १० ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावातील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



राजेंद्र, महादेव खडके व अलका अर्जुन वाडेकर यांच्या त्या मातोश्री होत.

## शांताबाई श्रीराम यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - पिसोरेखांड (ता.श्रीगोंदा) येथील रहिवाशी शांताबाई किसनराव श्रीराम (वय ७५) यांचे १० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्रीगोंदा खादी ग्रामोद्योग व पिसोरेखांड सोसायटीचे चेअरमन बबनराव श्रीराम यांच्या त्या मातोश्री होत.



## योगेश (गणेश) गोरे यांचे आकस्मित निधन

राहाता - येथील योगेश (गणेश) अशोक गोरे (वय ३३) (इलेक्ट्रेशियन) यांचे ९ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वा. आकस्मित दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई - वडील, चुलते, पत्नी, एक भाऊ, एक मुलगा असा परिवार आहे. ते नांदूर येथील प्रगतशील शेतकरी अशोक गोरे यांचे थोरले चिरंजीव, दिनेश गोरे यांचे बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## सक्षम स्थापना दिनानिमित्त दिव्यांगांचा सन्मान व रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर - सालाबाद प्रमाणे याही वर्षी सक्षम संघटने च्या स्थापनादिन विविध सामाजिक उपक्रमाने साजरा होणार आहे. यानिमित्त सक्षम अहमदनगर कै. परीक्षित कुलकर्णी एज्युकेशन सोसायटी, अ भा ब,भ युवा ब्राह्मण महासंघ, अहमदनगर रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, दहावी बारावीतील दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन प्रेमदान चौक येथील पिनॅकल डायबिटीस सेंटर व डेंटल केअर येथे होणार असल्याची माहिती सक्षम व रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी दिली.

हा कार्यक्रम जयवंत भावे सक्षमचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष श्रीधर बापट यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी मधुमेह तज्ञ डॉ. पुष्कराज कुलकर्णी, युवा ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष मंगेश निसळ, रोटरी क्लबचे सचिव निखिल कुलकर्णी, संध्या कुलकर्णी, वर्षा रोडे-पाठक, डॉ. अंजली केवळ, सुनील जगदाळे, भारती कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी, दीपक कुलकर्णी आदी उपस्थित राहणार आहेत.

नागरिकांनी समाजापासून वंचित असलेल्या घटकांसाठी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी केले.

रक्तदान करण्यासाठी ९३ ०७ ६२ ६५ ८२, ९१ ४५ ६१ ४४ ७० या नंबर वर संपर्क साधून आपला रक्तदानाचा हक्क बजावावा असे आवाहन सक्षम च्या वतीने करण्यात आले आहे.

# नगर-बीड-परळी रेल्वे नगरहुन मराठवाड्यात धावली

## अमळनेर ते विघनवाडी चाचणी यशस्वी, ताशी १२० किलोमीटर वेगाने धावली रेल्वे

नगर - बहुचर्चित असणारा रेल्वे मार्ग म्हणजे नगर बीड परळी रेल्वे मार्ग प्रकल्पांतर्गत अंमळनेर (भांड्याचे) ते विघनवाडी ३० किलोमीटर अंतराची चाचणी ताशी १२० कि मी वेगाने शुक्रवारी घेण्यात आली. लवकरच नगर ते बीड पर्यंत लोहमार्ग चे काम पूर्ण होणार असून त्यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांचा प्रवास सोपा व सुखकर होणार आहे.मराठवाड्यातील प्रवाशांची प्रतीक्षा आता संपणार आहे.



अमळनेर ते विघनवाडी चाचणी यशस्वी घेण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकारी. (छाया - विक्रम लोखंडे)

या सर्व लोहमार्गामध्ये डिझेल इंजिनचा वापर करण्यात आला आहे. गेल्या सात वर्षांपासून या रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे यापूर्वी नगर ते नारायणडोह, नारायणडोह ते सोलापूर वाडी, सोलापूर वाडी ते आष्टी, आष्टी ते अंमळनेर या मार्गाची चाचणी घेण्यात आली आता ९ ऑगस्ट रोजी ३० किलोमीटर रेल्वे मार्गाची चाचणी यशस्वीरित्या घेण्यात आली.

आता एकूण ९५ किलोमीटर अंतराची चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. तसेच या महत्त्वकांक्षी रेल्वे मार्गामध्ये महत्त्वाचे म्हणजे या रेल्वे मार्गावर अनेक मोठे पूल बांधण्यात आले.त्यासाठी मोठे तांत्रिक कौशल्य वापरून दक्षिण रेल्वे वरील सर्वात मोठा गल्डर टाकून रेल्वे रूळ अंथरण्यात आले आहेत. ५०० मीटर लांबीचे व १८ मीटर उंचीचे नऊ मोठे पूल बांधण्यात आले आहेत. त्यामुळे रेल्वे गाड्या धावण्यासाठी लोहमार्गाला बळकटी मिळणार आहे. शुक्रवारी झालेल्या चाचणीमध्ये या रेल्वे लोहमार्गाचा नेमका वेग काढण्यात आला. विघनवाडी ते परळी पर्यंतचा टप्पा पूर्ण होण्यास अजून एक वर्ष कालावधी लागू शकतो तसेच यावेळी ताशी १२० वेगाने धावली रेल्वे अशी माहिती उप मुख्य अभियंता बांधकाम राकेश कुमार यादव यांनी दिली.

यावेळी रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा, मुख्य प्राशकीय अधिकारी ए के पांडे, मुख्य अभियंता राजकुमार वानखेडे, उप मुख्य अभियंता राकेश कुमार यादव, सहाय्यक कार्यकारी अभियंता एस सुरेश, कार्यकारी अभियंता अवधेश मीना, सीनियर सेक्शन इंजिनिअर विद्याधर धांडोरे, सिनियर सेक्शन इंजिनिअर सत्येंद्र रा.कुवर, सिनियर सेक्शन संजय श्रीवास्तव एक्झिकेटीव, इंजिनिअर आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### घोळणा का फुटतो?

उन्हाळ्याच्या दिवसांत नाकातून रक्त येण्याच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. उन्हाळ्याच्या दिवसांत बहुतेक मुलांत ही समस्या होते. या समस्येलाच घोळणा फुटणे असे म्हणतात.

साधारणतः नाकाच्या आतील पदार्थ सुकून आतमध्ये चिकटतात आणि जेव्हा हे चिकटलेले पदार्थ काढण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा नाकाच्या आतील लाइनिंग सोलली जाते. यामुळे नाकातून रक्त वाहू लागते.

## पाककला

### कणसाची रस्सेदार छल्ली

**साहित्य** : ४ अमेरिकन कॉर्न, १ लहान चमचा बटर, मीठ चवीनुसार, तिखट आवडीनुसार, ४ लहान चमचे चाट मसाला, पाव वाटी लिंबाचा रस.

**कृती** : सर्वप्रथम प्रेशर कुकरमध्ये बटर गरम करून त्यात भुट्टे घालून चांगले हलवून घ्यावे. त्यात १/२ वाटी पाणी घालून कुकरचे झाकण लावून २-३ शिट्ट्या होऊ द्या.

**रस्सा तयार करण्यासाठी** :

लिंबाच्या रसात तिखट, मीठ आणि चाट मसाला घालून चांगले एकजीव करावे. आवडत असल्यास थोडे लोणीसुध्दा घालू शकता. भुट्टे उकळल्यावर त्यांना लिंबाच्या रसाने तयार केलेल्या रश्यात चांगल्याप्रकारे चोळून घ्यावे आणि गरम गरम भुट्टे सर्व्ह करावे.

## वास्तू

### पुस्तकांच्या दुकानासाठी

* पिवळा, आकाशी, गुलाबी रंग शुभ असतो.

## सल्ला

आमरस किंवा आंब्याचे कोणतेही पदार्थ धातूच्या भांड्यात साठवून ठेवू नका. त्याचा रंग बदलण्याची शक्यता असते.

## सौंदर्य

* बटाटा : मानेवरचा मळ काढण्यासाठी व काळवंडलेपणा घालवण्यासाठी कच्चा बटाटा कुस्करून त्याचा रस वा कुस्करलेला बटाटा मानेवर चोळा. ४-५ दिवसांत सारा काळवंडलेपणा दूर होईल.

* जर डोळ्यांतून पाणी येत असेल तर मोहरीच्या पावडरमध्ये मध मिसळून हुंगावा.

**- संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ११ ऑगस्ट २०२४

**भानुसप्तमी, सीतला सप्तमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, स्वाती अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर कराल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल.

**वृषभ** : लाभ होईल. काळजीपूर्वक काम करा. मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग.

**मिथुन** : कार्यक्षमता वाढल्याने उत्साह वाढेल. अभीष्टसिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील.

**कर्क** : अध्ययनात रूचि वाढेल. कामांची प्रशंसा होईल. भागीदारी पक्षात होऊ शकते. मनाला प्रसन्नता वाटेल.

**सिंह** : रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ. उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल.

**कन्या** : जोडीदारा बरोबर तणाव होईल. मतभेदांपासून लांब रहाल. व्यापार चांगला राहील. विवाह योग.

**तूळ** : मन प्रसन्न राहील. वाहने जपून चालवा. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**धनु** : अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. अर्थप्राप्तिचा योग. परिश्रमाने कामाचे शुम परिणाम येतील.

**मकर** : भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल.

**कुंभ** : काळजीपूर्वक काम न केल्याने नुकसान होईल.

**मीन** : पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**


## हसा आणि शतायुषी व्हा!

**बंडू** : अरे, काय झाले रडायला?

**खंडू** : मांजर आडवी गेली म्हणून सात पावलं मागे गेलो तर ट्रकने धडक दिली...

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



निरनिराळ्या रुपात अवतरतो
तो ईश्वर किती आनंददायी आहे
त्याच्या इच्छेनुसार ही त्याची रुपे प्रकट होतात


**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**

**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**

भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ६९८६

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) एक फूल; कमळ; पंकज; पुरुषाचे एक नाव ४) भूल पाडणारे भूत ७) स्वयंपाक वगैरे ज्यावर करतात ती अग्नीची भट्टी ८) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर ९) वस्तू; डाग; पर्वत ११) एक सुगंधी वनस्पती १२) लहान मुलांचा किंवा पक्ष्यांचा गोंधळ १४) घर; तेज; शरीर १५) एक पक्षी; बाई; स्त्री १७) राजाची बायको; क्वीन १८) शंकराचे वसतिस्थान १९) चहा पिण्याचे एक भांडे २१) विष्णूचे एक नाव २३) रात्रीचा चंद्र

**शब्दगंध क्र. ६९८५ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | दे | श | ■ | दै | वा | धी | न |
| दी | ■ | त | वा | ना | ■ | व | ट |
| प | त | ■ | स्त | ■ | बा | र | व |
| पा | ट | ली | पु | त्र | ■ | ■ | र |
| टी | ■ | द | स्त | ■ | ब | स | ■ |
| ल | ता | ■ | ■ | ना | ला | य | क |
| ■ | म | हा | ग | ■ | ब | ■ | ल |
| खा | स | ■ | त | मा | ल | प | त्र |

**उभे शब्द** :- १) एकाएकी; अकस्मात; आकस्मिक २) नांगीने प्रहार करणारा एक विषारी जीव ३) पाणथळ किंवा चिखलाची जमीन ४) तिरळा; काणा ५) तीव्र उठणारी वेदना; सणक; तिडीक ६) भास्कर; रवि; सूर्य १०) गलका; गडबड; गोंधळ १३) अंदाज; तर्क; अनुमान १४) जमिनीचा सारा; शस्त्राची धार; दर; भाव १६) भारुडासाठी प्रसिद्ध असलेले पैठणचे संत १८) पक्ष; बाजू; वकिली २०) चार वाणींपैकी एक २२) साधू; संन्यासी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : वार्तालाप करण्याची महान कला म्हणजे मौन. - **हॅझलिट.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कोणती उपचार पद्धती सगळ्यात चांगली?

ॲलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेद, युनानी, सिद्ध वैद्यक, ॲक्युप्रेशर, ॲक्युपंक्चर, निसर्गोपचार, चुंबकोपचार अशा उपचारांच्या अनेक पद्धती आहेत. प्रत्येक उपचार पद्धतीचे काही फायदे, काही तोटे असतात. सगळ्याच रोगांवर प्रत्येक पद्धतीत उपचार असतील असेही नाही. सगळ्याच पद्धती शास्त्रीय तपासण्याच्या आधारे पडताळून पाहता येतील असे नाही. कारण रोग बरा होण्यामागे शारिरीक कारणांखेरीज मानसिक कारणेही तितकीच महत्त्वाची असतात. वर्तमानपत्रामध्ये 'पोलिओचा लुळा पाय चांगला झाला', 'मतिमंदत्व दूर झाले', 'मधुमेह बरा झाला' आदी जाहिराती काही रुग्णांच्या नावानिशी छापून येतात. बरेच लोक त्या जाहिराती वाचून त्या डॉक्टरांकडे उपचाराला जातात; पण त्यांच्या पदरी निराशाच येते. काही रोग असाध्य समजले जातात. यात मेंदूच्या कार्यातील वा रचनेतील बिघाड, हातापायाचा लुळेपणा, मतिमंदत्व, मधुमेह, रेबिज (कुत्रे चावल्याने होणारा रोग) इत्यादी रोगांचा समावेश होतो. पुरेशा शास्त्रीय सिद्धतेखेरीज कोणीही हे रोग बरे करण्याचा दावा करत असेल तर तो ''मॅजिक ड्रग्ज अँड रेमेडीज'' ॲक्टनुसार दखलपात्र गुन्हा आहे. मतिमंदत्वावर उपचार नाहीत. कोणी जर ते करू शकत असेल, तर त्या व्यक्तीला नोबेल पारितोषिक मिळेल. त्यामुळे असे उपचार करून घेण्याआधी त्या क्षेत्रातील इतर तज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. कारण असे दावे बऱ्याचदा भोंदू डॉक्टरकडून केले जातात. नीतिनियम पाळून केलेली कोणतीही उपचारपद्धती काही रोगांमध्ये नक्कीच परिणामकारक ठरते. रोग बरा होण्यासाठी त्या त्या उपचार पद्धतीच्या तज्ञांकडेच जाणे मात्र आवश्यक ठरते.

## एकी

दोन तोंडाचा एक पक्षी, एका तळ्यात राहत होता...एकदा त्याला एक रामफळासारखे गोड फळ खायला मिळाले. तो फळ त्या पक्ष्याच्या एका तोंडाला खायला मिळाला तर... पक्ष्याच्या दुसऱ्या तोंडाला त्याचा खूपच हेवा वाटला... आणि त्याने पहिल्या तोंडाला अर्ध्या फळाची मागणी केली...

त्यावर पहिला तोंड त्याला म्हणाला... अरे... या फळाला तू खाल्लेस काय.... आणि मी खाल्ले काय... शेवटी आपले पोट तर एकच आहे...! तेव्हा हे अर्धे फळ... मी आपल्या बायकोला देतो.

त्या पहिल्या तोंडचे हे असे बोलणे ऐकून दुसऱ्या तोंडाला खूपच वाईट वाटले...! आणि त्या दिवसापासून तो तोंड निराशही राहायला लागला...

असाच एक दिवस, एक खूपच विषारी फळ दुसऱ्या तोंडाला मिळाले. ते बघितल्यावर पहिल्या तोंडाने ते नाही खाण्याचा सल्ला दिला... परंतु.... मागील वेळच्या रागामुळे दुसऱ्या तोंडाने त्याचा सल्ला ऐकलाच नाही.... आणि त्याने ते फळ खाल्ले... शेवटी जे व्हायचे तेच झाले. तो दोन तोंडी पक्ष्याचा मृत्यू झालाच.

**तात्पर्य** : एकीने राहण्यातच गोडी असते...! त्यात विरोध.... भांडण मुळीच होऊ देऊ नये.

## जीवन चक्र



ह्या स्वेच्छा कर्माचा प्रयोग करून आम्ही एक तर परमात्मा प्राप्तीच्या दिशेने जाऊ शकतो किंवा त्याच्या विरुद्ध दिशेला की ज्या दिशेला जाऊन आम्ही चौऱ्यांशी लक्ष योनीच्या चक्रात तसेच कर्माच्या जाळ्यात अडकून जाऊ की ज्यामुळे आमच्या प्रत्येक विचार, वचन व कार्यामुळे आम्हाला ह्या भौतिक संसारात वारंवार येतच रहावे लागेल. कर्माच्या विधानानुसार आम्ही चांगले कर्म करो अथवा वाईट कर्म करो त्यांचे चांगले अथवा वाईट फळ भोगण्यासाठी आम्हाला वारंवार ह्या संसारात येतच रहावे लागते. प्रभु परमात्म्या जवळ परत जाण्यासाठी आम्हाला ह्या चौऱ्यांशीच्या फेऱ्यातून बाहेर पडावे लागेल. यासाठी आम्हाला परिश्रम करावे लागतील. प्रभुप्राप्तीसाठी जे श्रम आम्हाला करायचे आहेत ते म्हणजे अंतरीक ज्योती व श्रृती वर ध्यान एकाग्र करणे. केवळ एक वेळेस ध्यान करणे पुरेसे नाही. आम्हाला दररोज कमीत कमी अडीच तास ध्यान अभ्यास करावाच लागेल व हेच कार्य दिवस, महिने, वर्ष सतत करावे लागेल. एकनिष्ठेने निरंतन केलेल्या परिश्रम स्वरूप आम्हाला परमेश्वर प्राप्ती नक्कीच होईल.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

सर्वोतम आने के लिए निबंध लिखना आवश्यक है। किसी विषय पर इस ढंग से लिखना। कि पढ़ने वाले की रुचि बनी रहे। विषय के दोष क्या है गुण क्या है। यह वर्णन करना चाहिए। जिस विषय पर लिखना है मन में उसका अच्छा सिलसिला बिठा लें। जिस विषय पर लिखना। अलग अलग लेखकों के विचार पढ़ लें। उनके विचार पढकर मन में उनकी रुपरेखा लें। विषय को अलग-अलग शीर्षकों में या सूत्रों में बांट लें। निबंध की शुरुआत किसी न विचार से करें। निबंध का अंत इस तरह से करें कि पाठक को लगे कि उसने सब कुछ जान लिया है। विषय से हट कर व्यर्थ की बातें न लिखें। यह जो भी निबंध है प्रायः हम दूसरे व्यक्तियों या घटनाओं पर लिखते हैं परंतु प्रत्येक व्यक्त्वि विद्यार्थी हर पल किसी न किसी पर निबंध लिख रहा है। यह जो हम प्रति पल सोच रहे हैं यह एक निबंध ही है। अगर हम दूसरों के बारे अच्छा सोच रहे हैं तो समझो हम अच्छा निबंध लिख रहे हैं। अगर बुरा सोच रहे हैं तो दूसरों के बारे बरा निबंध लिख रहे हैं। परीक्षा पास करने के लक्ष्य से निबंध लिखने और याद तो करने ही हैं। परंतु प्रत्येक विद्यार्थी और राज योगी को वास्तविक निबंध भी लिखने हैं। वह वास्तविक निबंध हैं किसी के प्रति हिंसा का भाव न हो। जब हिंसा का भाव मन से निकल जाएगा तो आप जीवन में बहुत महान बनेंगे। आपने एक पत्थर उठाया और किसी का सिर तोड़ देने के लिए फेंका। उसको पत्थर नहीं लगा और किनारे से निकल गया। पत्थर फेंकने की कामना की, आकांक्षा की, तभी हिंसा हो गई। पत्थर फेंकने की दुर्भावना की, ये हिंसा हुई। पत्थर फेंकने की दुर्भावना अचेतन में छिपी है। हिंसा का सम्बन्ध किसी को मारने से नहीं, हिंसा का सम्बन्ध मारने की दुर्भावना से है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'स्क्रिन टाईम'

१९८० च्या दशकात स्क्रिन हे साप्ताहिक छापलं जायचं. सिनेमाविषयक फोटो, बातम्या त्यात असायच्या. स्क्रिन अर्थात पडदा. मोठ्या पडद्यावरच्या अर्थात चित्रपटविषयक (रिलीज झालेले, होणारे, कलाकारांच्या मुलाखती इत्यादि) माहिती स्क्रिनमध्ये वाचायला मिळायची. त्यानंतर किंवा त्याच्या जवळपासच्या कालावधीत छोटं स्क्रिन अर्थात दूरदर्शन आलं आणि आता त्यापेक्षाही लहान स्क्रिन असलेला मोबाईल आला. प्रत्येक स्थळी हा मोबाईल जवळपास प्रत्येकाच्या हातात आहेच, काळाची गरज म्हणून. आपण कुठं आहोत हे सांगण्यासाठीचं हे यंत्र. आपण नेमकं कुठं आहोत ? हेच अनेकांना समजत नाही, हे मोबाईलाधिन झालेल्यांच्या बाबतीत म्हणता येईल असं काहीजण म्हणतात. काळासोबत चालायचं असेल तर मोबाईल वापरणं नक्कीच गरजेचं आहे. पण वापर मर्यादित हवाय की अमर्यादित हे प्रत्येक मोबाईलधारकाला समजायला हवं आहे. ज्यांचा व्यवसाय अथवा नोकरी मोबाईल वापरावर आधारित आहे त्यांच्या बाबतीत स्क्रिनटाईम जास्तच असेल हे आपण समजु शकतो पण इतरांचं काय ? काही तरुण मुलं, मुली तर म ोबाईलशिवाय राहुच शकणार नाहीत. एव्हरी एक्सेस इन पॉयझन अति तिथं माती - हे प्रत्येकाला कळतं पण वळत नाही.

मध्यंतरी यु पी एस सी परिक्षेत अत्यंत चांगल्या गुणांनी पास होऊन अधिकारीपदी निवड झालेल्या एका तरुणाची मुलाखत पाहिली, ऐकली. तो म्हणाला पहाटे चार वाजेपासून दुपारी एक वाजेपर्यंत सलग अभ्यास करायचो तेव्हा मोबाईल स्वीच ऑफ करुन ठेवायचो. मनात म्हणायचो आत्ता ह्या क्षणी मी जगाशी संपर्क न ठेवता मनापासून अभ्यास करुन अधिकारी झालो तरंच जग माझ्याशी संपर्क करणार. शिवाय दुपारी एक वाजेनंतर मोबाईल चालु केला तर फारच कमीत कमी वेळा मोबाईलचा वापर करायचो. ह्यावरुन लक्षात येतं की आपण मनापासून ठरवलं तर नक्कीच तसं करुच शकतो. आपला स्क्रिनटाईम किती असावा ह्याचं बंधन जोपर्यंत आपण, स्वतः वर घालुन घेणार नाही तोपर्यंत आपलं ध्येय साध्य होणारंच नाही. आपल्याकडील वैयक्तिक कॉन्ट्रॅक्ट आणि ग्रुप्सची संख्या पाहता आपण प्रत्येक मेसेज वाचु, पाहु, ऐकु लागलो तर अगदी चोवीस तासही कमी पडतील. चांगलं काय, वाईट काय हे आपल्या प्रत्येकाला चांगल्याप्रकारे समजतं पण एकदा का मोबाईल हातात आला तर वेळेचं आणि स्थळांचंही आपल्याला भान राहात नाही.

एका आज्जीला भेटण्यासाठी दोन नातु व दोन नाती आल्या. जेवण झाल्यावर जो तो आपल्या मोबाईलमध्ये गुंग झाला. शेवटी आज्जी म्हणाल्या आपली भेट झाली पण संवाद साधला गेला नाही. पण नातु, नाती ऐकण्याच्या स्थितीत नव्हत्या. रक्ताच्या नात्यासोबत जर आपण संवाद न साधता स्क्रिनटाईम वाढवंत असु तर हे नक्कीच वाईट आहे. मोबाईल काळावश्यक आहे पण जीवनावश्यक नाहीय हे आपल्या लक्षात येत नाही तोपर्यंत हे असंच चालु राहणार आहे. स्वतःसाठी, व्यायामासाठी, आपल्या माणसांसोबत संवाद साधण्यासाठी, एकमेकांना भेटण्यासाठी, ख्याली खुशाली विचारण्यासाठी, कुटुंबासाठी वेळ न देता स्क्रिनटाईम वाढत असेल तर आपल्या प्रगतीचे दरवाजे आपोआप बंद होणार आहेत हे निश्चित आहे.

कुठे थांबायचं हे ज्याला समजतं तो जीवनात योग्य निर्णय घेतो. मोबाईल जेवढा महत्वाचा आहे त्यापेक्षाही माणसं फार महत्वाची आहेत हे अत्यंत महत्वाचं आहे. शास्त्रज्ञांनी धोक्याचा इशारा दिला आहे की मोबाईलचा जास्तीत जास्त वापर करण्या मुळं भविष्यात कान, घसा, मेंदु संबंधित आजारांमध्ये वाढ होणार आहे. जगातली प्रत्येक विषयाची माहिती गुगलवर मिळेलंच पण यासाठी किती स्क्रिनटाईम द्यायचा हे ठरवणं अत्यंत महत्वाचं आहे. कमी वयात मुलांना चष्मा वापरावा लागतोय. स्क्रिनटाईम कमीत कमी ठेवा. काळजी घ्या. आपण आहोत तर जग आहे.

(लेख क्र.५१३)

- **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अ नगर., मो.९८२२७५८३८३

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

आरोग्याच्या दृष्टिकोनातून विचार करताना स्वास्थ्य टिकून राहावे व आजार झालाच तर तो लवकर बरा व्हावा, याकरिता ऋतुनुसार आहार-विहार यांचा विचार करणे गरजेचे आहे. कारण सहसा रोगांची लागण ही एक ऋतू संपून जेव्हा दुसरा ऋतू सुरू होतो, अशा ऋतुसंधिकालाम ध्ये लवकर होते. जर या ऋतूंची प्रत्येकाला स्वतचे आरोग्य चांगले सांभाळता येईल. इंग्रजी महिने फेब्रुवारी उत्तरार्ध, मार्च-एप्रिल पूर्वार्ध एप्रिल उत्तरार्ध, मे-जून पूर्वार्ध जून उत्तरार्ध, जुलै-ऑगस्ट पूर्वार्ध ऑगस्ट उत्तरार्ध, सप्टेंबर-ऑक्टोबर पूर्वार्ध ऑक्टोबर उत्तरार्ध, नोव्हेंबर-डिसेंबर पूर्वार्ध डिसेंबर उत्तरार्ध, जानेवारी-फेब्रुवारी पूर्वार्ध

**ऋतुसंधिकाल** :

सहा ऋतूंमध्ये निसर्गातील बाहेरील वातावरण व त्याचबरोबर शरीरातील त्रिदोष, सप्तधातू यांच्यामध्ये अनेक बदल घडतात. म्हणून त्या त्या ऋतुनुसार आहार-विहाराचे नियम पाळले, तर आरोग्य उत्तम प्रकारे टिकून राहते. जेव्हा एक ऋतू संपून दुसरा ऋतू सुरू होतो, त्या वेळेस बाह्य वातावरणात हळूहळू बदल होऊ लागतो. दोन ऋतूंच्यामधील हवाम ानाच्या स्थित्यंतराचा हा जो काल आहे, त्यालाच ऋतसंधिकाल म्हणजेच दोन ऋतूंना जोडणारा काल असे म्हणतात. पूर्वीच्या ऋतूतील शेवटचे आठ दिवस व सुरू होणाऱ्या ऋतूतील पहिले आठ दिवस असा पंधरा दिवसांचा जो काल असतो, त्यालाच तर असे म्हणतात. या काळामध्ये रोगाची लागण पटकन होते. कारण पूर्वीच्या ऋतूतील वातावरणाची सवय लागलेली असते. अशातच अचानक आगामी ऋतूच्या आगमनामुळे बाह्य वातावरणात बदल होतात त्याचा परिणाम शरीरावर पटकन जाणवतो. म्हणून या ऋतुसंधीच्या काळात आरोग्याची काळजी गरजेचे आहे.

उदाहरणार्थ : ग्रीष्म ऋतू संपून जेव्हा वर्षा ऋतू सुरू होतो, त्या वेळी शरीराला सात्म्य झालेले उष्ण वातावरण बदलून बाह्य वातावरणात ढगाळ हवा, पावसाची रिमझिम सुरू होते व हा अचानक झालेला बदल शरीराला सात्म्य होत नाही, म्हणून लगेचच थंडीताप, सर्दी-खोकला अशा आजारांचे रुग्ण जास्त पाहावयास मिळतात. याकरिता असे आजार होऊ नये म्हणून पूर्वीच्या ऋतूतील आहार-विहार हळूहळू कमी करून पुढील ऋतूतील आहार-विहार हळूहळू सात्म्य करून घ्यावा. अशा पद्धतीने सावकाशपणे हा बदल केला, तर आरोग्य चांगले टिकून राहते.

(क्रमशः)

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर


अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वास्तु 'सजगतेनें' तथास्तु !

## वास्तुविशारद– उपभोगता व वास्तु यातील महत्वाचा दुवा

शहरी जीवन असो वा ग्रामीण; माणसाच्या मूलभूत गरजांपैकी एक निवाऱ्याची गरज पुरविणारे एक क्षेत्र म्हणजेच बांधकाम क्षेत्र! तो निवारा म्हणजे केवळ रहाण्याची जागाच असे नव्हे तर कोणत्याही प्रकारचे आसऱ्याचे ठिकाण. मग ते कार्यालय, शाळा, महाविद्यालय, दवाखाना, व्यावसायिक जागा, प्रार्थना मंदिर इ. असोत ते सर्वोतोपरी योग्य असणे गरजेचे असते. एखाद्या गावाचा, शहराचा विकास हा त्याच्या पायाभूत सुविधांचा सर्वंकष असतो. या सुविधा पुरविण्याकरता असंख्य प्रकारची कामे करणारी सूत्रे सतत कार्यरत असतात. त्यात महत्वाचा घटक म्हणजे वास्तुविशारद! वास्तुविशारद हा एन्ड युजर आणि प्रत्यक्ष वास्तू अस्तित्वात आणणाऱ्या यंत्रणेमधील एक दुवा असतो.






### वास्तु उभारणी – टप्पा पहिला आणि अतिमहत्वाचा

ज्या वेळी एखादी जमीन खरेदी करून ती विकसित करण्याची वेळ येते तेव्हा ते काम आपण वास्तुविशारदाकडे सोपवणे गरजेचे असते. प्रथमतः ग्राहकाच्या वास्तूविषयीच्या नेमक्या गरजा जाणून घेतल्या जातात. जमिनीची कागदपत्रे नीट पडताळून पाहिली जातात. तसेच टाऊन प्लँनिंग खात्यातील विकास आराखडा आणि संबंधित जमीन यांची पडताळणी केली जाते. म्हणजेच ती जमीन कोणत्या झोन मध्ये आहे? तिथे कोणत्या प्रकारचे आरक्षण पडलेले आहे का? रस्ता रुंदीत प्लॉट ची जागा जाते आहे का ? अशा अनेक बाबींचा विचार केला जातो. हे झाले प्राथमिक स्वरूपाचे काम.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या जातात आणि नंतर ग्राहकाच्या गरजा, अपेक्षा आणि जागेची विकसित करण्यासाठीची क्षमता यांचा ताळमेळ घालून वास्तुविशारद त्या जागी काय आणि कसे बांधकाम करता येऊ शकते, किती प्रमाणात करता येईल, काय अडचणी आहेत आणि काय केले म्हणजे ग्राहकांचा जास्तीत जास्त फायदा होईल या संबंधी माहिती देतो. आता या सर्व पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक चर्चा होण्या करता निश्चितच वास्तूविशारदास त्याचा वेळ, बुद्धी आणि बुद्धिकौशल्य वापरावे लागते.

### वास्तु उभारणी– दुसरा टप्पा; सर्जनशीलतेचा

जर इथपर्यंत गोष्टी जुळून आल्या म्हणजे ग्राहक जर तयार असेल तर पुढील खरे काम त्यास वास्तुविशारदाकडे सोपवावे लागते. मग डिझायनिंगचा भाग येतो. त्यात प्लँनिंग म्हणजे कोणत्या खोल्या कोणती जागा कुठे आणि कशी असावी, वास्तू बाहेरून कशी दिसेल म्हणजे त्याचे एलिवेशन कसे असावे, उंची किती असावी, बांधकामास कोणते मटेरियल वापरावे, कसे आणि किती वापरावे म्हणजे ते आर्थिकदृष्ट्या सुयोग्य होईल अशा असंख्य बाबींवर काम केले जाते. याही व्यतिरिक्त नैसर्गिक वा कृत्रिम आपत्तीरोधक डिझायनिंग केले जाते आणि बांधकाम विकसनशीलतेच्या सर्व निर्बंधांचे पालन करून डिझाइन केले जाते हे विशेषत्वाने नोंदवावेसे वाटते. तशा वेळोवेळी सूचना, सल्ले आणि आराखडे पुरविले जातात.

### वास्तु उभारणी – सुयोग्य मार्गदर्शन

शैक्षणिक पात्रता नसताना केले गेलेले डिझाइन आणि योग्य सल्लागाराने दिलेला डिझाइन रुपी सल्ला यात निश्चितच प्रचंड तफावत असते. योग्य सल्लागार योग्य प्रकारे म्हणजेच सर्व नियमांचे पालन करतो. नियमांचे पालन केल्यामुळे वास्तू अयशस्वी कधीच होत नाही. सामान्य नागरिकांना चर्चेनुसार वास्तू कशी दिसेल याचा पुर्णतः अंदाज येत नाही त्या करता ३डी प्रतिमा ही पुरविल्या जातात.

### वास्तु उभारणी – टप्पा तिसरा; प्रत्यक्षात साकारण्याचा

प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करण्याकरता वर्किंग ड्राइंग बनवावी लागतात. बांधकाम सुयोग्य रीतीने आणि मुख्यत्वेकरून प्लँनिंग नुसार जागेवर होत आहे की नाही यासाठी वेळोवेळी बांधकाम सुरू असताना वास्तुविशारद आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जागेला भेट देणे आवश्यक असते, क्रमप्राप्त ठरते. बांधकाम पुर्ण होताना आणि झाल्यानंतरही कॉन्ट्रॅक्टरला काही काम चुकले असल्यास त्यास निदर्शनास आणून देणे व त्या योग्य वेळेत दुरुस्त करून घेणे ही जबाबदारी संबंधित सल्लागाराची असते. वास्तू सर्वार्थाने पुर्ण होण्यासाठीची १००% कागदपत्रावर अथवा ड्राइंगवर स्वाक्षरी व शिक्का देणे ही जबाबदारी वास्तुविशारद करत असतो.

### वास्तु उभारणी – तुमचा वास्तु वैद्य; वास्तु कौशल्य

या आणि अशा तत्सम सर्व जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्यासाठी वास्तूविशारदावर विश्वास ठेवणे आवश्यक असते जसे आपण डॉक्टरांवर पुर्ण विश्वास टाकतो त्याच प्रमाणे वास्तुविशारदावर १००% विश्वास टाकणे गरजेचे असते. कारण तो तुमच्या वास्तूचा डॉक्टरच असतो. एखादा प्रोजेक्ट म्हणजे त्याचे ते मुलच असते. त्याची तो नीट काळजी घेतो याची खात्री बाळगली पाहिजे. वास्तू सुंदर तरीही उच्च प्रतीची कार्यशील कशी होईल याचे त्यास ज्ञान असते. कमी वेळात जर तो तुमच्या प्रश्नांची उत्तरे देत असेल अथवा सल्ले देत असेल तर ते त्याचे त्याच्या क्षेत्रातील कौशल्य असते. त्याला लागलेला कमी वेळ आणि तुम्हास पडेलल्या शंकेचे वा आवश्यक सल्ल्याची तुलना होता कामा नये! त्याच्या कामाची कार्यतत्परता, बुद्धी कौशल्यता, व्यवसायासंबंधी असलेली जागरूकता आणि कामा संबंधी असलेला प्रामाणिकपणा याची कोणत्याही क्षेत्राशी तुलना न करता कामाचा योग्य मोबदला त्यास देण्यांसाठी सामान्य नागरिकच नव्हे तर वास्तुविशारदा कडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती / संस्थेने सजगतेने पहावे. वास्तुविशारदाची फीस टाळण्यासाठी कमी पैश्यात काम करून देणारे समाजात खूप असतात. परंतु संबंधित व्यक्ती/ कार्यालय/ कार्यप्रणाली ही शैक्षणिक रित्या आणि व्यावसायिकरित्या योग्य आहे का? याची तपासणी करून घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुळात आपण फसले जाऊ वा आपली फसगत होत आहे ही भावना सोडून देऊन बांधकाम क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती म्हणून सकारात्मकतेने पहाणे गरजेचे आहे.

### वास्तु उभारणी – सहज आणि सजग दृष्टिकोन

हसत खेळत काम पुढे नेत समाजाची पायाभूत सुविधांची गरज भागविणे हि एक काळाची गरज आहे. विश्वासाने एकत्र काम करून आपल्या गावाचा, शहराचा विकास घडवून आणणे ही एक सुजाण नागरिक म्हणून सगळ्यांचीच जबाबदारी आहे. गावाच्या, शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी, दर्जेदार कामासाठी तुमची वास्तू योग्य हातात सुपूर्त करा.

WE CREATE THE WORLD
Reg. No. Mah/1393/1987
F 1350/1988/ANR



बांधकाम नावातच बांधणे असा उल्लेख आहे. ज्यात वास्तूंसकट विश्वास बांधला जातो.... विश्वासाने पुढे या, विश्वासाने बांधुया.... विश्वसनीय, अतुलनीय कामगिरी करूया!

- Architect Swarupa Kulkarni Shahapurkar, B. Arch
(वास्तुविशारद), cell no. ७७४३९०९९०९.
Ingenious Design studio, Pune.,
Member of AESA, Ahmednagar region
Architectural consultant for Guinness World Records




# इंडो-आयरिश मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधील अत्याधुनिक कॅथलॅब व कार्डिओलॉजी विभागाचे ११ ऑगस्टला लोकार्पण

नगर – तपोवन रोडवरील इंडो-आयरिश जनरल अॅण्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हृदयरोगावरील प्रभावी उपचारांसाठी अत्याधुनिक कॅथलॅब व कार्डिओलॉजी विभाग कार्यान्वित होत आहे. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता या विभागाचे उद्‌घाटन होणार आहे. याप्रसंगी पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक येथील अनुभवी हृदयरोग तज्ज्ञ डॉ.रणजीत जगताप व दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे डॉ. शिरीष साठे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती हॉस्पिटलचे संचालक डॉ. दिलीप जोंधळे यांनी दिली.

हॉस्पिटलमधील कॅथलॅब व कार्डिओलॉजी विभागात जागतिक दर्जाच्या मशिनरी बसवण्यात आल्या आहेत. त्यामुळे हृदयरोगावरील सर्वात आधुनिक व प्रभावी उपचार याठिकाणी रूग्णांना उपलब्ध होतील. अनेक यशस्वी हृदय शस्त्रक्रियांचा अनुभव असलेले डॉ. रणजित जगताप व डॉ. शिरीष साठे यावेळी हृदयरोगावरील अत्याधुनिक उपचारांविषयी मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती किर्डिओलॉजीस्ट डॉ. मिलिंद कोरडे व फिजिशियन डॉ. प्रदीप कंठाळी यांनी दिली.

अत्याधुनिक आरोग्यसेवेला सामाजिक बांधिलकीची जोड देत आरोग्यसंपन्न, आनंदी समाजाची निर्मिती हा उद्देश समोर ठेवून हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. आयर्लंड येथे तब्बल ३३ वर्षे वैद्यकीय सेवा दिल्यानंतर डॉ.दिलीप आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून रूग्णांना याठिकाणी परिणामकारक उपचार सेवा देण्यात येत आहे.

हॉस्पिटलमध्ये १७० बेडस असून ५० बेडचा सुसज्ज आयसीयू आहे. बाल रूग्ण तसेच नवजात शिशुंसाठी आयसीयु बेडची स्वतंत्र व्यवस्था आहे. हॉस्पिटलमध्ये जनरल मेडिसीन, मधुमेह, वृध्दापकाळ, कार्डिओलॉजी, मूत्रविकार, स्त्रीरोग, वंध्यत्व निवारण, बालरोग, नवजात शिशु, अस्थिरोग, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा, फिजिओथेरपी, फार्मसी, रेडिओलॉजी, स्वत:चा अत्याधुनिक पॅथोलॉजी तपासणी विभाग आहेत. पक्षाघात, मेंदू शस्त्रक्रिया, शारीरीक दुखापत, हार्ट सर्जरी झालेल्या रूग्णांसाठी रिहॅबिलिटेशन सेंटरही येथे आहे.




# सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीचे धरणे

## पेन्शनबाबत दिलेल्या आश्वासनांचे शासन निर्णय १६ ऑगस्टपर्यंत निर्गमीत करा अन्यथा संपाचे हत्यार उपसणार

नगर – राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानूसार सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना व इतर प्रलंबित मागण्यांबाबत ठोस शासकीय निर्णय पारित करण्याच्या मागणीसाठी राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती अहमदनगर शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर क्रांती दिनानिमित्त शुक्रवारी (दि.९ ऑगस्ट) धरणे आंदोलन करण्यात आले. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासह शहरातील पाटबंधारे विभाग कार्यालय, कोषागार कार्यालय मध्यवर्ती इमारत, आयटीआय व पॉलिटेक्निक महाविद्यालय, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा विशेष लेखक कार्यालय आदी शासकीय, निमशासकीय कार्यालया समोर दुपारच्या सुट्टीत धरणे आंदोलन करुन निदर्शने करण्यात आली. या आंदोलनातून राज्य सरकारला १६ ऑगस्ट पर्यंत शासन निर्णय निर्गमीत करण्याचा अल्टीमेटम देण्यात आला असून, यापुढे पुन्हा संपाचे हत्यार उपसण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल पंडित, राजेंद्र आंधळे, अक्षय फलके, उमेश डावखर, संदिपान कासार, विजय तोडमल, देविदास पाडेकर, रावसाहेब नवगण, विजय काकडे, विलास पेद्राम, अरविंद वाव्हळ, भाऊ शिंदे, पुरुषोत्तम आडेप, नितीन मुळे, स्वप्निल खडामकर, दत्ता महामुनी, डॉ. मुकुंद शिंदे, सौ. पाटील, राजेंद्र चव्हाण, सयाजीराव वाव्हळ, खाकाळ, राहुल शिंदे, थोरात सर आदींसह सरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.




सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वाखालील सन २०२३ च्या मार्च व डिसेंबरमध्ये आंदोलन, संप करुन मागण्यांच्या सनदेचा आग्रह धरण्यात आला होता. राज्य शासनाने सुद्धा संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकारात्मक चर्चा करून कर्मचारीभिमुख निर्णय घेतले होते.

१४ डिसेंबर २०२३ रोजी नागपूरच्या विधानसभा अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री यांनी जुनी पेन्शन ज्या सुधारित स्वरूपात देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्याचा ढाचा निवेदनाद्वारे विधानसभेच्या पटलावर ठेवला आहे. त्यानुसार यासंबंधी शासन निर्णय पारित करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित होती, मात्र ती कारवाई अद्यापि पूर्ण झालेली नाही.

सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर करून राज्यातील कर्मचारी शिक्षकांना जुन्या पेन्शन प्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा असलेली पेन्शन योजना १ मार्च २०२४ च्या प्रभावाने सुरू केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. इतर मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर विशेषतः आरोग्य व शैक्षणिक विभागाबाबत चर्चा करून ठोस निर्णय घेतले जातील, असे निसंदिग्ध आश्वासन देण्यात आले होते. परंतु आजपर्यंत सुधारित पेन्शन योजनेचा शासन निर्णय पारित करण्यात आलेला नाही. चर्चासत्राचे आयोजन ही होऊ शकले नाही, त्यामुळे राज्यातील कर्मचारी, शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे समन्वय समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानूसार सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना व इतर प्रलंबित मागण्यांबाबत ठोस शासकीय निर्णय पारित करण्याच्या मागणीचे निवेदन समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना दिले.

# सफाई कर्मचारी हा समाजातील एक महत्त्वाचा घटक

## राहुल सोनवणे यांचे प्रतिपादन; अहमदनगर महापालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा

नगर – अहमदनगर महानगरपालिका सफाई कर्मचारी हा समाजातील एक महत्त्वाचा घटक असून त्यांच्या माध्यमातून शहरवासीयांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी मदत होत असते. ऊन, वारा, पाऊस या गोष्टींचा कुठेही विचार न करता दैनंदिन स्वच्छतेची सेवा नागरिकांना दिली जाते. मात्र त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये यासाठी सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्य संदर्भात जनजागृती करण्याचे काम महापालिकेच्या माध्यमातून केले जात असते. कर्मचाऱ्यांनी देखील आपले काम करीत असताना ड्रेनेज लाईन व चेंबर सुरक्षितपणे आणि योग्य पद्धतीने सफाई करावी शासनाच्या माध्यमातून नमस्ते अभियान राबवले जात असून त्या अंतर्गत यांत्रिकी सहाय्याचा वापर करणे गरजेचे आहे. या माध्यमातून सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होईल, असे प्रतिपादन पुणे येथील कम फाउंडेशनचे राहुल सोनवणे यांनी केले.



अहमदनगर महापालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना राहुल सोनवणे

अहमदनगर महानगरपालिका व पुणे येथील काम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नमस्ते अभियानांतर्गत सफाई कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळेत राहुल सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक आयुक्त सपना वसावा, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक परीक्षित बिडकर, आदींसह सफाई कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे संरक्षण कसे करावे याबाबत सखोल असे मार्गदर्शन यावेळी केले व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त नगर शहरामध्ये मोफत नेत्रतपासणी, शस्त्रक्रिया शिबीर

नगर – स्वातंत्र्यदिनानिमित्त येथील नेत्रविकारतज्ज्ञ व अहमदनगरमधील पूर्णवेळ रेटिना सर्जन डॉ.अक्षय साठे यांच्या पुढाकरातून शहरातील नगर-मनमाड रोडवरील प्रेमदान चौकाजवळील स्वस्तिक नेत्रालयातर्फे मोफत नेत्रतपासणी व अत्यल्प दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते ३० ऑगस्ट या कालावधित हे शिबिर होणार आहे.

स्वस्तिक नेत्रालयात डायबेटिक रेटिनोपॅथी-लेसर इंजेक्शन व शस्त्रक्रिया, डोळ्याचा मागील पडदा निसटणे निदान व शस्त्रक्रिया, उतरत्या वयामुळे दृष्टिपटलावर रक्त जमा होणे यावर इंजेक्शन थेरपी, अत्याधुनिक लेसर ट्रीटमेंट सेवा, गुंतागुंतीची मोतीबिंदू शस्त्रक्रिया व मार लागलेल्या डोळ्यांचे व्यवस्थापन या व इतर आधुनिक उपचार सुविधा रुग्णांना उपलब्ध आहेत.




# संताजी नागरी सहकारी पतसंस्था ग्राहकांना सेवा देण्यासाठी सदैव तत्पर

## हरिभाऊ डोळसे यांचे प्रतिपादन; वीज बील भरणा केंद्राचे उद्‌घाटन

नगर – गेल्या ३० वर्षापासून डाळमंडई येथे संताजी नागरी सहकारी पतसंस्थेची वाटचाल सुरू आहे. ग्राहकांना उत्तम सेवा देणे हे धोरण ठेवून संताजी नागरी पतसंस्थेची वाटचाल सुरु आहे. ठेवीदारांच्या विश्वासामुळे पतसंस्थेची भरभराट होत आहे. ग्राहकांच्या सेवेबरोबरच नगरकरांच्या हितासाठी पतसंस्थेने वीज बिल भरणा केंद्र सुरू केले आहे. संताजी नागरी सहकारी पतसंस्था ग्राहकांना सेवा देण्यासाठी सदैव तत्पर आहे. या सुविधेचा नगरकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संताजी नागरी पतसंस्थेचे मानद सचिव हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.



डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेत ग्राहकांना सेवा देण्यासाठी वीज भरणा केंद्राचे फित कापून उद्‌घाटन करताना जिल्हा व्यवस्थापक गोविंदराव फुले आदी.

डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेला एम.एस.ई.बी.च्या नाशिक विभागाकडून विद्युत वीज बील भरणा केंद्र चालविण्यासाठी परवानगी मिळाली आहे. या केंद्राचे उद्घाटन वीज महामंडळाचे नगर जिल्हा व्यवस्थापक गोविंदराव फुंदे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन सौ.मिराताई डोळसे, व्हाईस चेअरमन श्रीमती सिंधुताई शिंदे, मानद सचिव हरिभाऊ डोळसे, विज महामंडळाचे नगर जिल्हा व्यवस्थापक गोविंदराव फुंदे, लक्ष्मण देवकर, गोकुळ शिंदे, कैलास आप्पा करपे, सौ. सरलाताई शिंदे, बबनराव सैंदर, प्रकाश म्हस्के, सुरेश करपे, बाळासाहेब हजारे, देविदास साळुंके, क्षितीज भाटिया, अभय काळे, शशिकांत देवकर, पोपटराव शेजवळ, महेश कांबळे, आनंद डेव्हिड, पवन साळुंके, नंदु गुरसाळे, कुमार पाल, चंद्रकांत लिपांरे, देविदास ढवळे, परसराम सैंदर, भगवान नागले, राजु दारुणकर, कालिदास क्षीरसागर, गणेश दहीतुले, प्रविण इंगळे, विकी संजय इंगळे, गणेश हजारे, पतसंस्थेचे मॅनेजर जब्बार शेख, प्रमोद वाळके आदी उपस्थित होते.

गोविंदराव फुंदे म्हणाले, संताजी नागरी सहकारी पतसंस्थेने सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन विज बिल भरणा केंद्राची परवानगी घेतली आहे. या केंद्रात ग्राहकांना तत्पर व सुलभ पध्दतीने सेवा मिळेल. अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

क्षितिज भाटिया म्हणाले, हे विज बिल भरणा केंद्र माळीवाडा येथील मे. भाटीया एजन्सी येथे सुरू राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी.

सूत्रसंचालन जब्बार शेख यांनी केले. तर आभार प्रमोद वाळके यांनी मानले.

# निरामय

## संतुलित जीवनशैलीसाठी...

लाईफस्टाईल

पोषक आहार, पुरेसा व्यायाम आणि सोबतीला समाधान अशी आदर्श जीवनशैली राखणं ही तारेवरची कसरत ठरते. एकतर आपण डाएटचा अतिरेक करतो किंवा त्याकडे पूर्ण दुर्लक्ष तरी करतो. पण हे दोन्ही प्रकार टाळून सुवर्णमध्य गाठणं गरजेचं असतं. तन आणि मन दोघांनाही लाभदायी ठरणारी जीवनशैली कशी जपायची? जाणून घेऊ या.



* भूक लागलेली असताना खाणं आणि उगाचच भावनेच्या भरात चरत राहणं यात फरक करता यायला हवा. अन्न ग्रहण करतेवेळी संपूर्ण लक्ष खाण्यावर केंद्रित करा. यावेळी स्मार्टफोन वापरू नका. टीव्ही बघू नका.
* आपण नियमित व्यायामाचं महत्त्व जाणतो. शारीरिक कसरतीमुळे शरीरासोबतच मेंदूही निरोगी राहतो. त्यामुळे व्यायामाची निश्चित वेळ ठरवा आणि मुख्य म्हणजे ती पाळा.
* वजन कमी करण्याच्या नादात जेवण टाळू नका. यामुळे शरीराला पोषक घटक मिळत नाहीत. उगीच उपासमार होते. इतकंच नाही तर यामुळे अतिखाणं होतं.
* जेवताना शीतपेय किंवा फळांच्या रसाऐवजी पाणी प्या.

## कमी झोप, हृदयविकाराला आमंत्रण

आरोग्य चर्चा

आजकालच्या जीवनशैलीमुळे कामाचा ताण, खाण्याच्या अयोग्य वेळा, व्यायामाचा अभाव आणि इतर गोष्टींमुळे लोकांना विविध आजारांनी ग्रासले आहे. अनेक लोकांना लठ्ठपणाची समस्या सतावत आहे. त्यामुळे प्रौढ लोकांसह तरुणांमध्येही हृदयविकाराच्या झटक्याचे प्रमाण दिसून येत आहे. एका अहवालानुसार, कोरोना महामारीनंतर हृदयविकाराच्या घटनांमध्ये आणखी वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

यापूर्वी हृदयविकाराच्या झटक्याचे मुख्य कारण रक्तदाब, लठ्ठपणा मानले जात असे. मात्र या व्यतिरिक्त इतरही अनेक कारणे आहेत. हृदयविकारासारख्या जीवघेण्या स्थितीसाठी वाढलेला रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल हे प्रमुख जोखीमीचे घटक मानले जातात. कुटुंबातील सदस्यांना हृदयविकार आहेत अशा लोकांना किंवा लठ्ठ असणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा धोका अधिक असतो.



शरीरातील अतिरिक्त चरबीमुळे आरोग्यावर अनेक प्रकारे नकारात्मक परिणाम होण्याचा धोका असतो. वाढलेले कोलेस्ट्रॉल, हृदयविकाराचा कौटुंबिक इतिहास आणि अयोग्य आहारामुळेही हृदयविकाराचा धोका वाढतो.

या सर्वांव्यतिरिक्त, आपल्या दैनंदिन जीवनात अनेक वाईट सवयी आहेत, ज्यामुळे हृदयाला खूप हानी पोहोचते. आरोग्यासाठी चांगली झोप आवश्यक आहे. यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य दोन्ही सुधारते. नियमित पुरेशी झोप न मिळाल्यास तुम्हाला चिडचिड आणि थकवा जाणवू शकतो. या वारंवार झोपेच्या समस्येमुळे हृदयविकाराचा धोकाही वाढतो.

एका अभ्यासात, संशोधकांना असे आढळून आले, की सहा तासांपेक्षा कमी झोपणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता आठ तास झोपलेल्या लोकांपेक्षा दुप्पट असते. कमी झोपेमुळे रक्तदाब वाढू शकतो आणि जळजळ होण्याचा धोका वाढू शकतो. हृदयविकाराच्या झटक्यासाठी हे दोन्ही प्रमुख जोखमीचे घटक आहेत. वायुप्रदूषण हे श्वासोच्छवासाच्या आरोग्यासाठी आणि फुफ्फुसांसाठी हानिकारक मानले जाते. प्रदूषित हवेच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. नियमितपणे प्रदूषित हवेत श्वास घेणाऱ्या लोकांना रक्तवाहिन्यांचा आजार आणि हृदयरोग होण्याची शक्यता जास्त असते.

एका अहवालात, वायुप्रदूषण हे एथेरोस्क्लेरोसिससाठी जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

तंदुरुस्त राहणे आणि नियमित व्यायाम केल्याने हृदय निरोगी राहते; परंतु जास्त व्यायाम करणेदेखील धोकादायक ठरू शकते. जास्त शारीरिक व्यायामामुळे हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण सहा टक्क्यांनी वाढते. क्षमतेपेक्षा जास्त वजन उचलल्यामुळे किंवा दीर्घ शारीरिक हालचालींमुळे हृदयावर दाब वाढतो आणि त्यामुळे रक्तदाब झपाट्याने वाढण्याचा धोका असतो. अलिकडच्या वर्षांत, जिममध्ये हृदयविकाराचा झटका येण्याबाबत अनेक प्रकरणांची नोंद झाली आहे.

## बॅक्टेरिया ठरू शकतो वरदान!

नवसंशोधन

प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या विषाणूंचा बिमोड हे आरोग्यक्षेत्रापुढचं मोठं आव्हान आहे. त्यांना रोखण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांमध्ये प्रकाशाचा एक किरण दिसला आहे. उत्तर आयर्लंडच्या भूमीत आढळलेले बॅक्टेरिया अशा विषाणूंचा सामना करू शकतात, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इथली माती खूपच गुणकारी असल्याचं बोललं जातं.



प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या चार प्रकारच्या विषाणूंविरोधात हा बॅक्टेरिया प्रभावी ठरला आहे. त्यामुळे येत्या काळात अशा घातक विषाणूंना थोपवून धरता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## रात्री दात का घासावे?

दंतारोग्य

दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला जातो. पण बरेच जण रात्री झोपण्याआधी दात घासत नाहीत. अर्थातच ही मोठी चूक आहे. रात्री दात घासणं अत्यंत गरजेचं आहे.




दात न घासता झोपल्याने त्यावर प्लाकचा थर साचतो आणि दात कठोर बनतात. या थरामुळे तोंडाला दुर्गंधी येणं, हिरड्यांमधून रक्त येणं, जंतूसंसर्ग, हिरड्यांची सूज यांसारख्या समस्या निर्माण होतात. तोंडात सातत्याने आम्ल तयार होत असतं. रात्री दात घासल्याने आम्लाच्या निर्मितीला प्रतिबंध घातला जातो. बॅक्टेरियांची वाढ थांबते. तोंडात अन्नकण रहात नसल्यामुळे कुजण्याचा धोका रहात नाही आणि दात चांगले राहतात.

## जोडीदारास उच्च रक्तदाब, सावध व्हा!

व्याधी विचार

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना विविध आजारांनी ग्रासले आहे. कोणाला मधुमेह, रक्तदाब तर कोणाला लठ्ठपणाची समस्या भेडसावत आहे. परंतु, उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ही समस्येला केवळ प्रौढ व्यक्तीच नव्हे,



तर तरुणही मोठ्या प्रमाणात बळी पडत आहेत. उच्च रक्तदाबाची समस्या ही संसर्गजन्य नाही; परंतु तरीही जोडीदाराला ही समस्या असेल, तर तुम्हीही विविध आजाराला बळी पडण्याची शक्यता आहे. उच्च रक्तदाब हा अनियंत्रित जीवनशैलीमुळे होणारा आजार आहे. जोडीदार निरोगी जीवनशैलीचे पालन करत नसेल, तर त्याचा परिणाम तुमच्या आरोग्यावरही दिसू शकतो. उच्च रक्तदाब हृदयाला थेट हानी पोहोचवू शकतो. त्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' असेही म्हणतात.

अनियंत्रित जीवनशैली आणि अनियमित आहार यांमुळे हा आजार उद्भवण्याची शक्यता असते. रक्तदाब पूर्णपणे बरा होणे शक्य नाही; परंतु जीवनशैली आणि आहारात आवश्यक बदल करून बऱ्याच अंशी नियंत्रणात ठेवता येतो. तणावाखाली असल्याकारणाने तुम्ही या आजाराला बळी पडण्याचा धोका वाढतो. तणावमुक्त शांत झोपेसाठी गॅझेट्सपासून अंतर आणि श्वासोच्छवासाचे व्यायाम यांसारख्या पर्यायांचा अवलंब करा.

## नैराश्याचे बळी

मानसोपचार

आजच्या व्यस्त जीवनात प्रत्येकाला थोडी शांतता आणि शांतता हवी असते. रोजच्या व्यस्ततेतून आणि तणावातून सुटण्यासाठी लोक अशा ठिकाणांचा शोध घेतात जिथे ते काही क्षण शांततेत घालवू शकतात. बाथरूम अशीच एक जागा बनली आहे, जिथे लोक केवळ त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करत नाहीत तर काही काळ विश्रांती आणि शांततादेखील मिळवतात.

स्नानगृहाचे मुख्य कार्य म्हणजे आंघोळ करणे आणि इतर महत्त्वाची कामे करणे; पण आता लोक याकडे शांतीचे ठिकाण म्हणूनही पाहू लागले आहेत. बहुतेक लोक विशेषतः तरुण, आराम करण्यासाठी बाथरूममध्ये जातात. ४३ टक्के लोक शांततेसाठी बाथरूममध्ये वेळ घालवतात आणि १३ टक्के लोक त्यांच्या जोडीदाराशिवाय वेळ घालवण्यासाठी असे करतात.

प्रत्येक वयोगटातील महिलांपेक्षा पुरुष बाथरूममध्ये जास्त वेळ घालवतात. ते दर आठवड्याला सरासरी दोन तास बाथरूममध्ये घालवतात, तर महिला एक तास बेचाळीस मिनिटे घालवतात. 'ब्रिटिश असोसिएशन फॉर काउंसेलिंग अँड सायकोथेरपी'च्या सदस्य जॉर्जिना स्टारर यांच्या म्हणण्यानुसार, लोक बाथरूमला सुटकेचे ठिकाण मानतात. कारण, जीवन खूप व्यस्त आणि तणावपूर्ण बनते, तेव्हा प्रत्येकाला थोडी शांतता हवी असते.

## डोळे कोणत्या रंगाचे?

डोळ्यांचं आरोग्य

गडद रंगाचे डोळे असणाऱ्यांना हिवाळ्यातले नेत्रविकार जडण्याची शक्यता अधिक असते. निळ्या किंवा फिकट रंगाचे डोळे असणाऱ्यांमध्ये नेत्रविकारांचं प्रमाण कमी असल्याचं आढळून आलं आहे. हे अनुमान काढण्यासाठी १७५ विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला. फिकट डोळ्यांमध्ये प्रकाश कमी प्रमाणात शोषला जात असल्याचं तज्ज्ञ सांगतात.



## धोका डीप व्हेन थ्रोंबोसिसचा

लक्षात घ्या

डीप व्हेन थ्रोंबोसिस (डीव्हीटी) मध्ये मांडी किंवा पोटरीतल्या रक्तवाहिनीत गुठळी निर्माण होते. ही गुठळी रक्तप्रवाहात काही प्रमाणात किंवा पूर्णपणे अडथळे आणू शकते. याच्या प्रभावाने या भागातल्या मोठ्या रक्तवहिन्यांमध्ये गुठळ्या तयार होतात. या गुठळ्या रक्तप्रवाहात अडथळे आणतात किंवा फुटून रक्तात मिसळतात आणि शरीराच्या इतर भागात पोहोचतात. हे दूषित रक्त मेंदू, फुफ्फुस, हृदय तसंच शरीरातल्या इतर अवयवांमध्ये जाऊन नुकसान करू शकतं. दिवसातील बराच वेळ बसून राहणं, सतत पलंगावर पडून राहणं, प्रवासामुळे बराच काळ शारीरिक हालचाल न होणं, नुकतीच झालेली शस्त्रक्रिया किंवा दुखापत, हाड मोडणं, विशिष्ट औषधं किंवा गर्भनिरोधक गोळ्यांचं सेवन या बाबी डीव्हीटीला कारणीभूत ठरू शकतात विमान प्रवासादरम्यान ही समस्या जाणवू शकते. गरोदर महिला, स्थूल व्यक्ती, धूम्रपान करणारे, धमन्यांसंबंधी विकार असणारे, सतत व्हीलचेअरमध्ये बसणारे तसंच विशिष्ट प्रकारचे रक्तविकार असणारे या सर्वांना पायांमध्ये गुठळ्या होण्याची शक्यता बरीच जास्त असते.




पायात वेदना किंवा काठिण्य जाणवणं, सूज येणं, त्वचेचा रंग बदलणं, त्वचा लालसर दिसणं ही डीव्हीटीची लक्षणं आहेत. डीव्हीटीमुळे पल्मोनरी इंबोलिझमसारखी गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. यात रक्ताची गुठळी फुटून फुफ्फुसात जाते आणि धमन्यांच्या कार्यात अडथळे उत्पन्न करते. या समस्येवर तातडीने उपचार करावे लागतात. या समस्येमुळे गरोदर महिलांना गर्भपाताचा धोका असतो.

डीव्हीटीवर उपचार घेतल्यानंतर पुन्हा ही समस्या निर्माण होऊ नये यासाठी काळजी घ्यायला हवी. या रुग्णांनी पायांमधल्या रक्ताभिसरणाला अडथळे येणारे मोजे घालू नये. पायांवर पाय टाकून बसू नये. एकाच स्थितीत झोपू, बसू किंवा उभं राहू नये. विमानप्रवासात भरपूर पाणी प्यावं. मद्यपान कटाक्षाने टाळावं. गाडीतून प्रवास करताना पायांना थोडी मोकळीक द्यावी.

## केस गळत आहेत?

आजीबाईचा बटवा

केस गळण्यामागे काही जनुकीय कारणं असली तरी प्रदूषण, ताण, विविध रसायनांचा वापर यामुळेही ही समस्या निर्माण होते. पोषक घटकांचा अभावही केसगळतीला कारणीभूत ठरतो. हे थांबवण्यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असावा. दूध, दही, अंडी, मटार, सुका मेवा यांचं सेवन करता येईल. अंड्यातला पिवळा भाग, रताळी, ॲव्होकॅडो, यीस्ट, दुग्धजन्य पदार्थांमधून बियोटिन हा घटक मिळतो जो उपकारक ठरतो. यासोबतच मेडिटेशन आणि योगाचाही चांगला परिणाम दिसून येतो.



## निद्रानाश दूर करण्यासाठी...

आयुर्वेदाची वाट

आयुर्वेदानुसार अनिद्रा किंवा निद्रानाशाला वातदोष कारणीभूत ठरतो. औदासिन्य, अतिसंवेदनशीलता, काळजी, चिंता अशा वातासंबंधी भावनांचा झोपेवर परिणाम होतो. अपचन, बद्धकोष्ठतेसारखे विकार तसंच खाण्याच्या अनियमित वेळा असणाऱ्या लोकांना निद्रानाश होऊ शकतो. हे शास्त्र आठ तासांच्या झोपेचं तंत्र फारसं मानत नाही. त्याऐवजी झोपेचा दर्जा आणि प्रमाण सुधारण्यावर भर दिला जातो. शांत झोपेमुळे शरीरासोबत मन आणि आत्मा ताजेतवाना राहतो, असं हे शास्त्र मानतं. आयुर्वेदात निद्रानाशावर उपचार आहेत. आपल्या विकाराचं नेमकं कारण जाणून त्यानुसार तज्ज्ञांकडून उपचार करून घेणं गरजेचं असलं तरी सर्वसाधारणपणे यावर दिल्या जाणाऱ्या औषधांची माहिती जाणून घेऊ या.



* निद्रानाशाचा त्रास असल्यास झोपण्याआधी १.५ ग्रॅम पिप्पलमूल चूर्ण पाण्यासोबत घ्यावं.
* एक ग्रॅम स्वमांमाक्षिक भस्म झोपण्याआधी गुळासोबत घेतल्यानेही आराम मिळतो.
* १२५ मिलीग्रॅम वाताकुलांतक दिवसातून दोन वेळा मधासोबत घेतल्याने शांत झोप लागायला मदत होते.
* शांत झोपेसाठी दिवसातून दोन वेळा अश्वगंधाच्या कॅप्सूल्स घ्याव्या. ब्राह्मीच्या दोन कॅप्सूल्सही उपयुक्त ठरू शकतात. ५०० मिलीग्रॅम ब्राह्मी, एक ग्रॅम आवळा आणि ५०० मिलीग्रॅम वाळा यांचं मिश्रण दिवसातून तीन वेळा दुधातून घेणंही लाभदायी ठरतं.

## कोणत्या वस्तू किती काळ वापरायच्या?

आपण कुठे चुकतो?

घरात बऱ्याच वस्तू साठवून ठेवलेल्या असतात. अशी बराच काळ जपलेली उशा, पांघरूणं वर्षानुवर्षं वापरणं आरोग्याला घातक ठरु शकतं. म्हणूनच नव्या वर्षात अशा जुन्या आणि आरोग्याला हानिकारक सामानाला बाहेरचा रस्ता दाखवा.



* आकार बदललेल्या, रंग उडालेल्या, कापूस बाहेर आलेल्या उशा काढून टाका. उशांवर सर्वात जास्त धूळ साठत असते. त्यांच्यावर अनेक घातक जंतूंचा वास असतो. त्यामुळे साधारणत: दर दोन वर्षांनी उशा, पांघरूणं बदलायला हवी.
* सजावटीच्या हेतूने सुगंधी मेणबत्त्या वापरल्या जातात. त्या जळत असताना घरात सुगंध दरवळतो. प्रसन्न वाटतं. पण उघड्यावर पडलेल्या मेणबत्त्यांवर भरपूर धूळ साठते. तसंच या धुरात घातक रसायनं असू शकतात. हा धूर श्वासावाटे शरीरात जाणं घातक ठरू शकतं.
* डबाबंद किंवा प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा कालावधी संपत आल्यास टाकून द्या. ताजे आणि आरोग्यदायी पदार्थ खा.



* कालावधी उलटून गेलेली औषधं घरात ठेऊ नका. त्यांचं सेवन खूप घातक ठरू शकतं. कालावधी पूर्णपणे न उलटलेल्या औषधांचा प्रभाव कमी झालेला असतो. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधं घेऊ नये.



* टॉवेल, पंचे, नॅपकिन्स जास्त काळ वापरू नये. त्यात भरपूर बॅक्टेरिया असतात. नियमित धुण्यामुळेही बॅक्टेरिया कमी होत नाहीत. त्यामुळे वापर सुरू केल्यापासून साधारण वर्षभराने ते टाकून द्यायला हवे. ओटा स्वच्छ करायचे स्पंज तसंच लाकडी आणि प्लास्टिक चॉपिंग बोर्डही काही काळाने बदलून टाका.

## काय आहे हॉलिडे हार्ट सिंड्रोम?

आरोग्यवेध



शुभकार्याच्या निमित्ताने किंवा आनंद साजरा करण्यासाठी कौटुंबिक स्नेहसंमेलनांचं आयोजन केलं जातं. अनेकदा मित्रमंडळींच्या भेटीगाठी घेण्याचा कार्यक्रम ठरतो. पार्ट्या झडतात. नातेवाईकांना भेटण्यासाठी तसंच मित्रांसोबत मजा कारण्यासाठी आपण त्यात सहभागी होतो. पण अशा सततच्या पार्ट्यांचा आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. अतिमद्यपान तसंच जंक फूडमुळे 'हॉलिडे हार्ट सिंड्रोम' जडण्याची शक्यता असते. यात हृदयाचे ठोके अनियमित होतात. याला वैद्यकीय भाषेत 'हार्ट ॲरिथमिया' आणि 'आट्रियल फायब्रिलेशन' म्हणतात. अतिमद्यपान केल्यानंतर ही समस्या उद्भवू शकते. यामुळे निरोगी व्यक्तीच्या हृदयाचे ठोकेही अनियमित होऊशकतात.

हॉलिडे हार्ट सिंड्रोममुळे हृदयाच्या ठोक्यांशी संबंधित समस्या निर्माण होतात. या समस्यांचा संबंध अतिमद्यपानाशी जोडण्यात आला आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या अभ्यासानुसार ख्रिसमस आणि नववर्षाच्या काळात हृदयविकाराचा धोका वाढत असल्याची बाब समोर आली आहे. मद्यपान थांबवल्यानंतर हॉलिडे हार्ड सिंड्रोम आपोआप बरा होतो. मद्यपान केल्यानंतर हृदयगतीत अनियमितता जाणवली तर काही काळ यापासून लांब रहा. अल्कोहोल चेतासंस्थेवर प्रभाव टाकतो. हॉलिडे हार्ट सिंड्रोमला प्रतिबंध करण्यासाठी प्रमाणात मद्यपान करायला हवं. आर्थिक ताण किंवा पार्टीच्या आयोजनाच्या ताणामुळेही ही समस्या उद्भवू शकते. चुकीच्या आहारामुळेही त्रास होऊ शकतो. हा त्रास असेल तर जंक फूड तसंच गोड पदार्थांपासून लांब रहायला हवं.

हृदयविकार असणाऱ्यांनी या त्रासाकडे दुर्लक्ष करता कामा नये. त्यातही अल्कोहोलमुळे उद्भवलेल्या हॉलिडे हार्ट सिंड्रोमकडे केलेलं दुर्लक्ष घातक ठरू शकतं. चक्कर येणं, छातीत दुखणं, श्वास घ्यायला त्रास होणं, शुद्ध हरपणं अशी काही लक्षणं दिसू शकतात. वेळेत उपचार झाले नाहीत प्रकरण हृदयक्रिया बंद पडणं किंवा स्ट्रोकपर्यंत पोहोचू शकतं.

हृदयाची योग्य ती काळजी घेण्यासाठी नियमित आरोग्यतपासणी गरजेची ठरते. हृदयविकाराला प्रतिबंध घालण्यासाठी मद्यपान आणि धूम्रपान कमी करा. नियमित व्यायाम करा. थंडीमध्ये व्यायाम टाळण्याची कारणं शोधू नका. चालणं, धावणं यासारखे सहज जमण्यासारखे व्यायाम करा. यामुळे ही समस्या कमी होईल त्याचबरोबर वजनही नियंत्रणात राहू शकेल. आहारात हिरव्या पालेभाज्या, सुका मेवा, ओमेगा ३ फॅटी ॲसिडयुक्त पदार्थांचा समावेश करा. प्रक्रिया केलेले, खारवलेले पदार्थ टाळा. कोलेस्टेरॉल आणि रक्तदाबावर लक्ष ठेवा. उच्च रक्तदाब तसंच वाढलेल्या कोलेस्टेरॉलमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर हृदयाचं आरोग्य बिघडणार नाही. हृदय तंदुरुस्त आणि कार्यक्षम राहण्यास मदत होईल.

## ‘सिद्धार्थ वाणी’



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ उनका चातुर्मास सावेडी मे विराजमान है।

------------


जिनवाणीचे वेगळे नाव आहे श्रद्धा, विश्वास आहे. जिनवाणीच्या प्रति दृढ आस्था सर्वश्रृत आहे, ज्या हृदयात श्रद्धेचा दिवा प्रज्वलित होतो त्यात कधीच अंधःकार होत नाही. आंधळ्याचे सहा प्रकार आहे, क्रोध, मान, माया, लोभ, काम, जन्म हे सहा प्रकार आहे पण जन्माने आंधळे तर नाही, आरामशिर व्यतित करतो, मिथ्यात्वचा आंधळा एक आंधळा माणुस आपल्या नातवाबरोबर त्याच्या खांद्यावर हात ठेवून तो रोज मंदिरात जात असे. त्या माणसाला मंदिरात जाताना रोज एक माणूस पाहत असे. एके दिवशी त्या माणसाने त्या अंध व्यक्ती सुरदासला विचारले, तुम्हाला दिसत नाही तर मग तुम्ही रोज मंदिरात का जातात. तेव्हा सुरदास म्हणाला, मी आंधळा आहे, पण देव तर आंधळा नाही ना, आंधळा आहे यालाच म्हणतात दृढ विश्वास आणि श्रद्धा.

वाल्मिकी ऋषी ‘राम राम’ नावाच्या ऐवजी ‘मरा मरा’ चा जाप करू लागले हे मंत्र चुकीचे होते, उच्चार चुकीचे होते पण श्रद्धा अटुट होती. ‘मरा मरा’ उच्चार करत करत ते मोठे ऋषी बनले ही आहे श्रद्धा परंतु हृदयाच्या विपरीत श्रद्धाहीन व्यक्तीला कितीही धर्मोपदेश केला तरी त्यावर काहीही परिणाम होत नाही, आडाची श्रद्धा मेणबत्ती सारखी आहे. जोरात हवा आली तर मेणबत्ती विझते, तसेच थोडं कष्ट त्रास झाले तर धर्माकडे दुर्लक्ष होते. आज-काल सम्यक् श्रद्धा कमी झाली आहे. सम्यक्चा अर्थ काय? सम्यकचा अर्थ आहे खरेपणा यथार्थ वास्तविकता, देवाने स्पष्ट सांगितले आहे जर आपला आपल्यावर विश्वास नसेल तर ती श्रद्धा अंधविश्वास व अंधश्रद्धेत रुपांतर होते, अंधश्रद्धेचा अर्थ आहे विना विचार करता कोणत्याही गोष्टीवर अथवा व्यक्तीवर विश्वास करणे. अंधश्रद्धने काही फायदा होत नाही. आपण तीर्थंकराच्या वाणीवर विश्वास ठेवून बजबूत बनवूया, सम्यक श्रद्धा आपल्या जीवनात यावी हीच कामना.

– सौ. सविता चोरडिया

## ‘सावित्री शक्तीपीठ’ तर्फे किशोर डागवाले यांना महात्मा फुले पुरस्कार

नगर –भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि मनपा स्थायी समितीचे माजी सभापती किशोर डागवाले यांना महात्मा फुले पुरस्कार जाहीर झाला आहे.



सावित्री शक्तीपीठाच्या प्रमुख अर्चना कावलकर यांच्या संस्थेने हा पुरस्कार देण्याचे ठरवले. याची घोषणा पुरस्कार समितीचे प्रमुख पुणे येथील दशरथ कुळधरण यांनी केली आहे.

# अपार्टमेंटच्या पुनर्विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) आवश्यकता

अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या प्रत्येक सदनिकाधारकाचे जुन्या जागी नवीन घर हे स्वप्न असते. त्या नवीन जागेत आधुनिक सोयी सुविधा, जसे लिफ्ट, सोलर वॉटर हिटर, सुरक्षेची व्यवस्था इ.असाव्यात असे जुन्या झालेल्या अपार्टमेंटच्या फ्लॅटधारकांना वाटणे साहजिकच आहे. तेसच मुबलक पार्किंगही आता काळाची गरज बनली आहे.

नगर शहरात अनेक जुन्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. काही ठिकाणी अपार्टमेंटमध्ये वारंवार दुरुस्ती करावी लागते. कॉस्मेटिक दुरुस्तीवर लाखो रुपये खर्चूनसुध्दा इमारती नेहमीप्रमाणेच जुन्या राहिल्या आहेत. अशा या जुन्या किंवा मोडकळीस आलेल्या इमारतीतून नवीन संकल्पना घेवून नाविन्यपूर्ण मजबूत इमारती उभ्या करणे हे सुध्दा एक हिमालयीन कार्य आहे.

अश्या प्रत्येक वेळी दुरुस्तीवर खर्च करणेही प्रत्येक सदनशिकाधारकास शक्य नसते. मग, इमारतीच्या पुनर्विकासाचा विषय पुढे येतो. पुनर्विकास करण्यासाठी सभासदांना स्वतः चे काहीएक पैसे खर्च न करता नवीन आधुनिक सदनिकांचे स्वप्न पूर्ण करता येणे शक्य आहे. परंतु, सभासदांना इमारतीच्या बांधकामाविषयी असलेले अपुरे तांत्रिक वा कायदेशीर ज्ञान, इमारतीमधील सभासदांमध्ये पुनर्विकासाविषयी मतभेद निर्माण करतात. अशा मतभेदांमुळे इमारतीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया लांबणीवर पडते. जसजसे दिवस जातात, तसतशी इमारतीची अवस्था अजून खराब होते. विविध कारणांमुळे इमारतींचा पुनर्विकास हा एक गंभीर विषय बनला आहे.

**इमारतीचा पुनर्विकास करताना सभासदांच्या मनात पुढील गोष्टी येतात..**

१. इमारतीचे बांधकाम करण्यासाठी योग्य विकासक किंवा बिल्डर मिळेल का?

२. तो अर्धवट काम तर सोडणार नाही?

३. मला परत वेळेवर ठरल्याप्रमाणे माझ्या सदनिकेचा ताबा मिळेल का?

४. नवीन इमारतीच्या कामाचा दर्जा चांगला असेल का? कि पुन्हा १७-१८ वर्षांनंतर दुरुस्त्या निघतील. कमीत कमी ४० वर्षे इमारतीच्या बांधकामात काहीही दोष निघायला नको.

५. दुसऱ्या जागेत म्हणजे तात्पुरत्या स्वरुपात भाड्याच्या जागेत स्थलांतर करताना तेथील भाडे, स्थलांतराचा खर्च किंवा नवीन जागेची अनामत रक्कमेची मला कोणत्याही प्रकारे आर्थिक झळ लागता कामा नये. अशा अनेक गोष्टींची चिंता असते.

म्हणजेच इमारतीच्या पुनर्विकासामुळे मूळ सभासदाला कोणत्याही प्रकारे खर्च न येता, त्याच्या जुन्या सदनिकेपोटी, वाढीव क्षेत्राचा फ्लॅट, आधुनिक सोयीसुविधांसह व आवश्यक त्या पार्किंगसह नवीन सदनिका त्याच इमारतीत मिळू शकते. पुनर्विकासाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या इमारतींचे कोणत्याही अडचणीशिवाय पुनर्विकासाचे काम विनासायास यशस्वीरित्या पूर्ण व्हावे ही काळाची मोठी गरज आहे.

रिअल इस्टेटच्या किंमती नवीन उच्चांकाला स्पर्श करत असताना, जुन्या इमारतीतील रहिवाशांना, त्यांच्या मालमत्तचे वाढीव मूल्य मोठ्या प्रमाणात अनलॉक करण्याची संधी पुनर्विकासाव्दारे मिळते. जरी ही प्रक्रिया सामान्य पणे विन-विन परिस्थितीप्रमाणे वाटत असली, तरी पुनर्विकासाची प्रक्रिया वाटते तितकी सोपी नसते.

सध्या मुंबई-पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये पुनर्विकास प्रकल्पांची गंगा वाहत आहे. मात्र बऱ्याचवेळा, योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे किंवा सभासदांमधील अर्धवट तांत्रिक, कायदेशीर ज्ञानामुळे सभासदांचा फायदा होण्याऐवजी ते बेघर होत असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे आल्यात. आता नगरसारख्या शहरांम ध्येही इमारत पुनर्विकासाची संकल्पना जोर धरत आहे. बऱ्याचवेळा सोसायटी आपल्या ओळखीच्या बिल्डरला पुनर्विकासाचे काम देते, अश्यावेळी पुनर्विकासाची सर्व सूत्रे बिल्डरच्या हाती जातात. जो जास्त वाढीव क्षेत्र देईल, तो सर्वात योग्य विकासक. मग त्यांना **उदा.** २५% वाढीव क्षेत्र मिळते परंतु प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार योग्य ते सर्व हिशोब शास्त्रोक्त रीतीने तपासून सभासदांना २५% पेक्षा जास्त क्षेत्र मिळवून देऊन वर वाढीव कॉर्पस फंड सुचवितो.

अशा परिस्थितीत पुनर्विकास प्रकल्प हाती घेवू इच्छिणाऱ्या संस्थांमध्ये पारदर्शकता यावी व सभासदांना ‘सुरक्षित’ करण्यासाठी राज्याच्या सहकार विभागाने महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० च्या कलम ७९ (ए) अंतर्गत सोसायट्यांना पाळण्यासाठी **‘मार्गदर्शक तत्वे’** प्रथम ३ जानेवारी २००९ रोजी व नंतर सुधारित मार्गदर्शक तत्वे’ दि.४ जुलै २०१९ रोजी जारी केली आहेत.

पुनर्विकासाचे काम करणाऱ्या विकासकाकडे किंवा बिल्डरकडे आर्किटेक्ट, कायदेतज्ज्ञ, स्ट्रक्चरल इंजिनिअर इ. व बांधकाम क्षेत्रातील कामगार यांची संपूर्ण यंत्रणा असते. त्या यंत्रणेच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी व काही चुकीची बाब घडत असेल तर त्यावर अंकुश ठेवण्यासाठी सोसायटीकडे देखील तशीच समांतर व परिपूर्ण यंत्रणा हवी. व त्यासाठीच **‘प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार’** (PMC) ची नियुक्ती अनिवार्य आहे.

पुनर्विकासातील व्यवहार्यता, सभासदांना कोणकोणते व्यवहार्य फायदे व ते का मिळायला हवेत याचे मार्गदर्शन व सर्व खाचाखोचा, संभाव्य अडथळे या सर्वांबाबतची योग्य माहिती प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार’ (PMC) सभासदांना त्याने तयार केलेल्या अहवालातून देतो

PMC ची यंत्रणा ही अनुभवी व माहितगार आर्किटेक्ट, कायदेतज्ज्ञ, स्ट्रक्चरल इंजिनिअर, आर्थिक सल्लागार (CA) आणि विशेषतः बांधकाम साईटवरील सर्व कामांचा अनुभव असलेल्या तज्ज्ञांची असोसिएशन असते. सगळे सल्लागार PMC च्या एकाच छताखाली उपलब्ध होतात. मात्र असे निदर्शनास येते की, अनेक सोसायट्या **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार**’ (PMC) ची नेमणूक करण्याऐवजी वेगवेगळ्या वेळी एकमेकांसोबत काम न केलेल्या वेगवेगळ्या तज्ज्ञांची वेगळी निवड करतात. या सर्वांचे एकमेकांसोबत सूर (Tunning) जुळले नाही तर प्रकल्पामध्ये अडचण निर्माण होवू शकते व त्याचा परिणाम अंतिमतः सभासदांना भोगावा लागतो. त्यामुळे सोसायटीतील व्यवस्थापकीय समितीने व सभासदांनी या क्षेत्रातील परिपूर्ण ज्ञान असलेल्या व बांधकाम क्षेत्रात दीर्घ अनुभव असलेल्या PMC ची नेमणूक करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

बर, या PMC ची जी काही फी किंवा शुल्क असेल ते सुध्दा विकासकाकडूनच घेतले जाते.

PMC ठरवताना कोणत्या विकासकाला किंवा बिल्डरला पुनर्विकासाचे काम दिले जाणार आहे, हे आधी निश्चित नसते. कालांतराने निविदा प्रक्रिया राबवून व निविदा भरण्याऱ्या सर्व विकासकांमधून सोसायटी तील सभासदांच्या संमतीने अंतिम तीन विकासकांची केली जाते .नंतर, त्यां तीन विकासकांबद्दलची तांत्रिक व आर्थिक माहिती घेवून, तसेच त्यांनी यापूर्वी केलेल्या कामांचा लेखाजोखा घेवूनच सभासदांच्या संमतीने अंतिम विकासक ठरवला जातो. त्यामुळे PMC त्याचा पुनर्विकाससंबंधीचा प्रकल्प व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) पारदर्शकपणे व अचूकच देतो.

अनेकवेळा सभासद नवीन बांधत असलेल्या किंवा नुकत्याच बांधून पूर्ण झालेल्या इमारतीला (Site Visit) भेट देतात. तेथील सुंदर लाद्या, मार्बल, ग्रॅनाईटचा वापर, मॉड्युलर किचन, फॉल्स सिलिंग, आकर्षक रंगसंगती, लाईटींग, काचांचे पॅनल्स, सोयीसुविधा पाहून आपले मत राजरोसपणे मांडतात व अमूक तमूक विकासकाबद्दल आपला अभिप्राय व्यक्त करतात. खरे पाहिले तर ही अंतर्गत सजावट, प्रत्येक विकासकाची त्याच्या सदनिकांच्या विक्रीसाठी गरजेचे बाब आहे. सभासदांना आवडलेल्या गोष्टी म्हणजे इमारतीची ताकद व दर्जा नव्हे. इमारतीची ताकद ती त्या इमारतीचे स्ट्रक्चरल RCC डिझाईन, वीट बांधकाम, वॉटर प्रुफिंग इत्यादीवर अवलंबून असते. त्यामुळे पुनर्विकासाच्या इमारतीच्या कामाचा दर्जा तपासण्यासाठी तज्ज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार’ (PMC) हवा

काही विकासक नक्कीच चांगले आहेत. पण विकासक चांगले असले तरी ते स्वतः प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम करीत नाहीत. मटेरियल सप्लायर्स, ठेकेदार, कामगार हे सर्व बांधकामांमध्ये कार्यरत असतात. आणि म्हणूनच (विकासक चांगला असला तरी) बांधकामवर सोसायटीचाच अंकुश व देखरेख असायला हवी. त्यासाठी सोसायटी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार’ (PMC) मार्फत बांधकामावर देखरेख ठेवू शकते. म्हणूनच पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार’ (PMC) आवश्यक आहे. मग तो स्वयंपुनर्विकास (Self Redevelopment) असो किंवा विकासकामार्फतचा पुनर्विकास (Redevelopment) असो.

**– इंजि. प्रकाश जैन**
B.E.(Civil), Chartered Engg.
Govt.regd.Valuer,
Rera Consultant
प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व बांधकाम तज्ञ
आदर्श कन्स्लटंन्सी
ओ/१,
आदर्श समृध्दी अपार्टमेंट
चौपाटी कारंजा, अहमदनगर
मो. ९४२२२२०७६२



# जॉब फेअरच्या माध्यमातून नगर येथील युवकांच्या ‘नोकरीचा प्रश्न’ मार्गी लावला

### प्रा.शशिकांत गाडे यांचे प्रतिपादन; एकता फौंडेशनच्या जॉब फेअरला युवकांचा प्रतिसाद : ६० कंपन्यांचा सहभाग

नगर – आज नोकरी मिळविणे खूप अवघड झाले, असे म्हणतात परंतु वास्तविक अनेक क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत, परंतु त्यासाठी प्रशिक्षित व तंत्रशुद्ध प्रशिक्षणाची गरज आहे. तुमच्यात जर गुणवत्ता असेल तर निश्चित नोकरी मिळू शकते. कोरोनानंतर विविध क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत, त्यामुळे नोकरीच्याही संधी आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या येत आहेत, या कंपन्यांना प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. नगरमध्येही अनेक मुख्य कंपन्यांच्या उपकंपन्या आहेत, त्यामुळे नगरमध्येही नोकरीच्या संधी आहेत. आजच्या जॉबफेअरच्या माध्यमातून युवकांना एकत्रित अनेक कंपन्यांचे व वेगवेगळ्या पदासाठी नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्याने त्यातून युवकांच्या नोकरीचा प्रश्न मार्गी लागत आहे. एकता फौंडेशन गेल्या दोन वर्षांपासून नोकरी मेळावाचा जो उपक्रम राबविला तो खरोखरच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांनी केले.




एकता फौंडेशनच्यावतीने माऊली संकुल येथे जॉब फेअर २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांच्या हस्ते झाले.

एकता फौंडेशनच्यावतीने माऊली संकुल येथे जॉब फेअर २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन प्रा.शशिकांत गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी आमदार दादाभाऊ कळमकर, एकता फौंडेशनचे प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर, अभिषेक कळमकर, किरण काळे, विक्रम राठोड, संजय शेंडगे, सुरेखा कदम, सुवर्णा जाधव, बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे, सचिन शिंदे, दत्ता जाधव, संतोष गेनप्पा, प्रशांत गायकवाड, परेश लोखंडे, संग्राम कोतकर, संदिप दातरंगे, शिवाजी कदम, अतुल डागा, अभि गायकवाड, प्रताप गडख, प्रशांत भाले, पवन गांधी, शिल्पा वाळके, हर्षवर्धन कोतकर आदि उपस्थित होते.

प्रास्तविक संभाजी कदम म्हणाले, भगव्या सप्ताहाच्या निमित्ताने एकता फौंडेशनच्यावतीने युवकांना नोकरी मिळावी, या हेतूने या नोकरी मेळाव्याचे आयोजन केले गेले, कंपन्यांमध्ये लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ व युवकांना चांगल्या संस्थेत नोकरी मिळवून आपला उदानिर्वाह सुरु करता यावा, यासाठी या मेळाव्याचे एकता फौंडेशनच्या माध्यमातून हा मेळावा घेण्यात आला.

प्रारंभी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व शिवसेना उपनेते स्व.अनिल राठोड यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात येऊन उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका पाटील शेळके व सुजय दरेकर यांनी केले. यावेळी भगवान फुलसौंदर, अभिषेक कळमकर, किरण काळे, बाळसाहेब बोराटे, विक्रम राठोड, दत्ता जाधव, अतुल डागा यांनी या जॉब फेअरसाठी शुभेच्छा दिल्या. या नोकरी मेळाव्यात नगर,सुपा, चाकण आदिंसह नगरमधील ६० कंपनीचा सहभाग होता. यामध्ये आयटी, इंडस्ट्रियल, फायनान्स, इंजिनिअरिंग, मेडिकल, मार्केटींग, सेल्स, मिडिया अशा विविध क्षेत्रातील नामवंत कंपन्या या नोकरी मेळाव्यासह सहभागी झाल्या होत्या.

मेळावा यशस्वी करण्यासाठी एकता फौंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मनपाने अखेर तेलिखुंट रस्त्याचे काम सुरू केले पण दिवाळीपूर्वी ते पूर्ण करावे

### काँग्रेसचे दीप चव्हाण यांची मागणी

नगर – निवडणुकांच्या तोंडावर अखेर पत्रकार चौक, लालटाकी, तेलीखुंट ते भिंगारवाला चौक या रस्त्याचे काम अखेर सुरू झाले पण ते किमान दिवाळी अगोदर पूर्ण करा अशी मागणी काँग्रेस प्रदेश सचिव दीप चव्हाण यांनी केली आहे.

या रस्त्याच्या कामाला अगोदरच मंजुरी मिळालेली असताना निवडणुका सुरू होण्याच्या अगोदर हे काम सुरू करण्याच्या उद्देशाने ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देऊनही त्याने उशिराने अखेर कामाला सुरुवात केली आहे.

याबाबत दीप चव्हाण यांनी पालिकेला निवेदन देऊन हे रस्त्याचे काम त्वरित सुरू न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता. त्यांच्या पत्राची दखल घेऊन पालिकेने घाई गडबडीने शुभारंभ केला.

दलित वस्ती सुधार योजनेतील गोकुळवाडी, हरिजन वस्ती आधी रस्त्यांची तसेच तेलिखुंट येथील रस्त्याच्या कामांची वर्क ऑर्डर देण्यात आली आहे परंतु आपण १३ ऑगस्ट रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता आणि नाशिक शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आचारसंहिता या कारणांमुळे या कामाला विलंब झाला आता लवकरच हे काम आपण सुरू करू असे आश्वासन आणि आपण आंदोलन करू नये असे पत्र पालिकेने ९ ऑगस्ट रोजी दीप चव्हाण यांना दिले आणि आज या रस्त्याचे उद्घाटन झाले.

गेली अनेक वर्षे नगरकर खस्ता खात असलेल्या रस्त्याचे हे काम सुरू झाले ही आनंदाचीच बाब आहे पण हा सिमेंट काँक्रीट रस्ता करण्यासाठी किमान ९० दिवस म्हणजे तीन महिन्यांचा कालावधी लागतो. त्या काळात दिवाळी येऊन जाते आणि दिवाळीच्या तोंडावर जर बाजारपेठ रस्त्याच्या कामामुळे बंद राहिली तर बाजारपेठ उध्वस्त होईल त्यामुळे त्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याची मागणी चव्हाण यांनी केली आहे. तसेच उद्घाटन समारंभापूर्वी या रस्त्यावर ठिकठिकाणी दिडशे कोटी रुपये निधीचे मोठ-मोठे बॅनर लावण्यात आले त्यावर राज्य सरकार आहे ना नगर मनपा. मग हे रस्ते नेमके कोणत्या नियोजन मधून होत आहेत. हे लोकांना कळलेले नाही. त्या रस्त्याला मंजुरी देताना पालिकेने स्वतःचा ३०% निधी यासाठी दिलेला आहे त्याचा उल्लेख कुठेच नाही.

नगर मनपा हद्दीतील हा रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्यावर १००% पालिका मालक आहे. मग पालिकेने किमान या रस्त्याचे काम किती किलोमीटर आहे, कोणाला दिलेले आहे, या कामावर किती खर्च होणार आहे याचा खुलासा करणारा फलक नागरिकांच्या माहितीस्तव लावावा असा सल्लाही चव्हाण यांनी दिला आहे.

या पुढील काळात अशीच अनेक विकासकामे सुरू होतील. निवडणुका संपेपर्यंत ती अर्धवट स्थितीत राहतील मग पुढे काहीच होणार नाही असे होऊ देऊ नका. अशी कृती नगरकरांना दिशाभूल करून काहीजण स्वतःचे उखळ पांढरे करून घेतील पण प्रशासनाने यात भर घालू नये, असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.



श्रावण महिन्यातील नागपंचमी सण निंबळकमध्ये साजरा करताना गावातील महिला.

## निंबळकमध्ये नागपंचमी सण उत्साहात साजरा

नगर – श्रावण महिन्यातील नागपंचमी हा सण सालाबाद प्रमाणे निंबळक मध्ये अतिशय आनंदात साजरा झाला. सकाळपासूनच आपल्या घरासमोर सडा-रांगोळी काढून या सणाला सुरुवात झाली. दुपारनंतर सुवासिनींनी ग्रामदैवत खंडोबा रायांच्या मंदिर प्रांगणात जावून तेथील वारुळावर नागदेवतेची पूजा करून नागपंचमी सण साजरा केला. देव-देवतांना गोड नैवेद्य अर्पण केले. तेथे उपस्थित असलेल्या सुवासिनींनी एकमेकींना हळदी- कुंकू लावून सणाच्या शुभेच्छा सुद्धा दिल्या. लहान मुले-मुली सुद्धा आपल्या मातांबरोबर आनंदात सहभागी झाले होते.

नागपंचमी सणात महत्त्व असणारे झोके मात्र फार कमी दिसून आले.याचे कारण मोठे वृक्ष व दोरखंड सुद्धा आता पूर्वीसारखे राहीलेले दिसत नाहीत.

## ‘अत्याचार प्रकरणी’ आरोपीचा जामीन खंडपीठाने नाकारला

नगर- खंडाळा (ता. श्रीरामपूर) येथील अत्याचार प्रकरणातील आरोपी मोरे यास औरंगाबाद खंडपीठाने जामीन देण्यास नकार दिला.

दोन वर्ष तीन महिने वयाच्या मुलीवर आरोपीने अत्याचार केला होता. जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन नामंजूर केला. त्यानंतर औरंगाबाद खंडपीठानेही जामीन देण्यास नकार दिला.

फिर्यादीतर्फे ॲड.अजित चोरमल पाटील यांनी काम पाहिले.

# बसस्थानकात पोलीस बंदोबस्त नियुक्त करा



शहरातील माळीवाडा, तारकपुर, स्वस्तिक चौक येथील बसस्थानक हे प्रवासासाठी महत्त्वाची बस स्थानक आहेत. या बस स्थानकावर मोठ्या संख्येने प्रवाशांची गर्दी दिसून येते. अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या सदर स्थानकावरून सुटतात. माळीवाडा बसस्थानकात पोलिस चौकी आहे परंतु स्वस्तिक चौक बसस्थानकात पोलिस चौकीचा पॉइंटच केला नाही तर तारकपूर स्थानकात पोलिस पॉइंटच्या कक्षात पोलिस कर्मचारीच उपस्थित नसतात.

बस मध्ये चढता, उतरताना गोंधळ उडतो. अशावेळी गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात गुन्हेगार चैन चोरी, पाकीट मारी, पर्स चोरी, पिशवीतील दागिन्यांची व पैशांची चोरी करण्यात यशस्वी होतात. अशा वेळी बस स्थानकावर मात्र ड्युटीवर पोलीस दिसून येत नाहीत, किंवा कधीकाळी दिसलेल्या पोलिसाची ड्युटीच नसते. पोलिसांनी सदर बस स्थानके दुर्लक्षित केली आहेत काय? ज्यामुळे अशा घटना घडत आहेत. ड्युटीवर पोलिस दिसून येत नसल्याने व या संदर्भात अनेकदा वृत्तपत्रात बातम्या येऊनही फरक पडलेला नसल्याने आता प्रवासी जनतेने नेमके काय समजायचं? असा सवाल प्रवासी वर्गातून केला गेला आहे.

छाया – महावीर पोखरणा

